# * प्रास्तविक व भूमिका *

' प्र. के. अत्रे लिखित मृत्युलेखांचा अभ्यास ('हुंदके' व 'समाधीवरील अश्रू' या संग्रहाआधारे)

मृत्युलेख हा वाङ्.मयप्रकार मराठीमध्ये प्रामुख्याने इंग्रजी वाङ्.मयातून आला आहे. मृत व्यक्तीबद्दलचे स्मरण करणे, तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे यातून मृत्युलेखांची निर्मिती होते. परकीय भाषेतून हा वाङ्.मयप्रकार जरी मराठीत आला असला तरी आधुनिक मराठी वाङ्.मयात विकसित झालेला हा गद्य वाङ्.मयप्रकार आता स्थिरावला आहे. हे लेखन बव्हंशी वृत्तपत्रीय असले तरी देखील सर्वच वृत्तपत्रीय लेखनाला वाङ्.मयीन दर्जा असतोच असे नाही. परंतु आचार्य अत्र्यांमुळे त्याला वाङ्.मयीन प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

विडंबनकार नाटककार, विनोदी लेखक म्हणून आचार्य अत्र्यांच्या वाङ्.मयाचे आजवर मूल्यमापन झाले आहे. मात्र मृत्युलेखकार म्हणून अत्र्यांचे मूल्यमापन झालेले नाही. ज्या लेखकामुळे मराठी वाङ्.मयात मृत्युलेख ह्या वाङ्.मयप्रकारास वाङ्.मयीन प्रतिष्ठा लाभली. त्या लेखकाचा या दृष्टीने अभ्यास होणे आवश्यक आहे. ह्या जाणीवेतूनच ह्या विषयाची संशोधनासाठी निवड केलेली आहे.

'मृत्युलेख' हा वृत्तपत्राच्या अग्रलेखासाठी तत्कालीन गरजेतूनच लिहिण्यात येणारा वाङ्.मयप्रकार. एका अर्थाने हे लेखन जरी प्रसंगोपात झालेले असले तरी इतर वाङ्.मय प्रकारांच्या तुलनेत ह्या वाङ्.मय प्रकाराचे स्वरुप काहीसे वेगळे आहे. प्रबंधिका लेखनासाठी हा विषय निवडण्यामागे अत्र्यांच्या मृत्युलेख लेखनाबरोबरच मृत्युलेख ह्या वाङ्.मय प्रकाराचा अभ्यास करणे हादेखील उद्देश आहे. कथा, कादंबरी, कविता, ललितनिबंध हे वाङ्.मयप्रकार बहुतांशी कल्पनाधिष्ठित असल्याने त्यातील कलानुभव हा जरी प्रत्यक्ष जीवनातील असला तरी त्यात लेखकाच्या कल्पनेचाच बराचसा भाग असतो. मात्र मृत्युलेख ह्या वाङ्.मय प्रकारचे तसे नाही. मृत्युलेखातील कलानुभव हा त्या लेखातील प्रत्यक्ष व्यक्ती जीवनाशी संबंधित असतो. ती व्यक्ती या ना त्या कारणाने वाचकांस परिचित असते. किंवा जरी नसली तरी त्या व्यक्तीचा एकूणच जीवनव्यापी आढावा मृत्युलेखात येत असल्याने मृत्युलेखामुळे त्या व्यक्तिमत्त्वाचे काही अंशी का होईना दर्शन होते. तसेच या वाङ्.मय प्रकारात लेखकाला त्या व्यक्तीचे आकलन झालेले जीवन मांडत असताना अनुभवांची मोडतोड करण्याचे फारसे स्वातंत्र्य नसते. हा वाङ्.मय प्रकार सत्यधिष्ठित असल्याने मृत्युलेखकाराला त्या व्यक्तीविषयक सत्याच्या चौकटीत राहूनच मृत्युलेख फुलवावा लागतो. तसेच

मृत्युलेख लेखनाच्या निमित्ताने लेखकाचे त्या व्यक्तीबद्दलचे विचार, चिंतन, भावना, अनुभव यांचाही प्रत्यय येतो. एका अर्थाने मृत्युलेखात लेखकाच्या मनातील त्या व्यक्तीसंबंधीचे भावसौंदर्य आणि प्रत्यक्ष त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व यांचा सुंदर मिलाफ झालेला असतो. यातच मृत्युलेख ह्या वाङ्.मय प्रकारचे वेगळेपण असल्याने हा वाङ्.मय प्रकार अभ्यासासाठी अधिक भावला आहे.

अत्र्यांचे वाङ्.मय विपुल आहे. आत्मचरित्र, नाटक, काव्य, कथा, चित्रपट कथा, कादंबरी, विनोद, प्रवासवर्णन, समीक्षा, ललितगद्य याहूनही अत्र्यांचे चरित्रलेखन आणि त्याहूनही अधिक मृत्युलेख लेखन विलक्षण ताकदीचे आहे. अत्र्यांनी लिहिलेल्या मृत्युलेखांमधून अत्र्यांच्या मनाला असणारे कारुण्याचे स्वाभाविक आकर्षण प्रत्ययास येते. मृत्युलेख हा वाङ्.मयप्रकार अत्र्यांपूर्वी काही निबंधकारांनी निबंधवजा स्वरुपात हाताळला. 'संदेश' पत्राचे कर्ते अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्या मृत्युलेख लेखनाचा बराचसा परिणाम अत्र्यांच्या मृत्युलेख लेखनावर झाला आहे. हे खरे असले तरीदेखील 'आधुनिक मराठी वाङ्.मयामध्ये मृत्युलेखांस वाङ्.मयीन प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्याचे कर्तृत्व अत्र्यांचेच आहे. त्यामुळे मराठी पत्रकारितेच्या इतिहासात अत्र्यांची मृत्युलेखकार म्हणून विशेष ख्याती आहे. हा विषय संशोधनासाठी निवडण्यामागे अत्र्यांचा मृत्युलेखकार म्हणून अभ्यास करणे हादेखील उद्देश आहे.

'प्र. के. अत्रे लिखित मृत्युलेखांचा अभ्यास' करीत असताना खालील बाबींकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले आहे.

मृत्युलेख ह्या वाङ्.मय प्रकारासंबंधी मूलभूत विवेचन करीत असताना मृत्युलेख म्हणजे काय? मृत्युलेखांचा इतर वाङ्.मय प्रकारांशी असणारा संबंध, मृत्युलेखांची परंपरा यांचा शोध घेतला आहे. तसेच मृत्युलेख ह्या वाङ्.मय प्रकाराचे गुणदोष व अत्रे लिखित मृत्युलेखांचे गुणदोष याबद्दल चर्चा केली आहे.

आचार्य अत्र्यांच्या बहुरंगी वाङ्.मयीन व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेतला आहे. तसेच 'हुंदके' व 'समाधीवरील अश्रू' ह्या मृत्युलेखसंग्रहामधील मृत्युलेखांचे वाङ्.मयीन विशेष, लेखनशैली, भाषाशैली यांचा शोध घेतला आहे. वरील दोन संग्रहाखेरीज अन्य संग्रहातील मृत्युलेखांचाही विचार एका प्रकरणात केला आहे. अत्र्यांनी लिहिलेल्या मृत्युलेखांमधून प्रत्ययास येणारी व्यक्तिदर्शने, समर्पक शीर्षके, कथात्मकता, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ, विचारप्रणाली, अत्र्यांचे मृत्युलेखांमधील व्यक्तींबद्दलचे विचार, चिंतन, भावना, अनुभव यांचे विवेचन केले आहे.

एकंदरीत मृत्युलेख हा वाङ्.मयप्रकार इतर वाङ्.मयप्रकारांच्या तुलनेत निश्चितपणे वेगळया प्रकृतीचा आहे. या लेखनामधून व्यक्तिजीवनाचा जो अर्थ गवसतो त्यामागे निश्चितपणे मृत्युलेखकाराचीही

---

## * प्र क र ण 1 ले *

---

## 'मृत्युलेख : तात्त्विक स्वरुप, उद्‌गम, मृत्युलेख आणि अन्य वाङ्‌मय प्रकार, आणि मृत्युलेखांचे प्रकार'

### * मृत्युलेख म्हणजे काय ?

मृत्युलेख म्हणजे काय ? यादृष्टीने विचार करताना असे म्हणता येईल की, 'मृत व्यक्तीबद्दलचे तिच्या मरणानंतर स्मरण करणें, तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे यातून मृत्युलेखांची निर्मिती होते.

मृत्युलेख हा आधुनिक मराठी वाङ्‌मयात विकसित झालेला गद्य प्रकार आहे. मृत्युलेखाचा आशय हा मृत्युलेख ज्या व्यक्तीवर आहे तिच्या जीवनाशी संबंधित मृत्युलेखकार असतो. मृत्युलेखातून त्या व्यक्तीचे जीवनदर्शन घडवत असतो. व्यक्तिमत्त्व दर्शनामुळे व जीवनदर्शनामुळे मृत्युलेख ह्या लेखनप्रकारास वाङ्‌मयीन गुण प्राप्त झाले आहेत.

मृत्युलेखातील कलानुभव म्हणजे मृत व्यक्तीचे जीवनच असते. त्यामुळे मृत्युलेखात मृतव्यक्ती व मृत्युलेखकार यांच्या संबंधाना फार महत्त्व आहे. मृत्युलेखकाराच्या मनाला जेंव्हा एखाद्या व्यक्तीचा मृत्यू स्पर्श करुन जातो, त्याच्या मनाला चटका लावून जातो तेंव्हाच मृत्युलेख चांगला वठतो. अन्यथा त्यास केवळ जंत्रीचे स्वरुप आले तर तो मृत्युलेख चांगला वठला आहे असे म्हणता येणार नाही. मृत्युलेखाचे लेखनही लेखकाच्या दृष्टीनेही एक परीक्षाच असते. मृत व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व मृत्युलेखकाराला किती समजले यावरुनच त्याच्या लेखनातून ती व्यक्ती प्रगट होत असते. त्याबरोबर लेखकास व्यक्तीविषयक वाटणारी स्वाभाविक हळहळ, जिव्हाळा या बाबीही मृत्युलेखातून व्यक्त होत असतात.

### * मृत्युलेखांचे स्वरुप –

मृत्युलेख ह्या वाङ्‌मय प्रकाराच्या स्वरुपाचा विचार करीत असताना मृत्युलेख ह्या वाङ्‌मय प्रकाराचे स्वरुप भावनिक व गंभीर असते ही गोष्ट पहिल्यांदा नमूद करावयास हवी. मृत्युलेखात व्यक्तीदर्शन तर असतेच असते पण त्याबरोबरीने आदरांजली, स्मरण, जिव्हाळा असा भावनिक भाग

अधिक असतो. हा वाङ्मय प्रकार मूलतः लेखकाच्या व वाचकाच्या भावनेला स्पर्श करणारा आहे. अर्थात सर्वच वाड्.मयप्रकार लेखक व वाचक यांच्या भावनेशीच संबंधित असतात तरी देखील मृत्युलेख हा मृत व्यक्तीच्या मृत्यूशी व व्यक्तिमत्त्वाशी संबंधित असल्याने आणि मानवी जीवनात मृत्यू ही गोष्टच गंभीर असल्यामुळे साहजिकच या वाड्.मयप्रकारास एक प्रकारचे भावगांभीर्य प्राप्त होत असते.

मृत्युलेखामध्ये व्यक्तीचे चरित्रवर्णन येणे स्वाभाविकच आहे. त्याबरोबरीने मृत्युलेखकार व मृत्यू पावलेली व्यक्ती यांच्याधील व्यक्तिगत संबंध ज्या प्रकारचे असतील त्याचे प्रतिबिंब मृत्युलेखामध्ये पडत असते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवत असताना तिच्या जीवनातील केवळ जंत्री देऊन भागत नाही तर तिच्या व्यक्तिमत्त्वातील सूक्ष्म पैलूंचे दर्शन, व्यक्तिगत आठवणी, तिचा व्यक्तिमत्त्व विकास, व्यक्तीची वैचारिकता, तिच्या जीवनात आलेले चढउतार, तिच्या भोवतालची परिस्थिती, तिचे कार्यक्षेत्र, या बाबींचे चित्रण लेखक करीत असतो. मात्र तो हे चित्रण सरधोपट पद्धतीने न करता त्या व्यक्तीशी संबंधित आठवणी, प्रसंग यांच्या साहाय्याने त्या व्यक्तीच्या एकंदरीत जीवनाचा घेतलेला हा अल्पसा का होईना शोध असतो. यातूनच मृत्युलेखकाराच्या मनातील विशिष्ट मृत व्यक्तीबद्दलचे प्रेम, जिव्हाळा, सहानुभूती, आदर व्यक्त होत असतो. एका अर्थाने मृत्युलेखकार मृत्युलेखातून त्या व्यक्तीच्या जीवनाचे मूल्यमापन करीत असतो. मृत्युलेखात लेखकाचे त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलचे चिंतन येते.

मृत्युलेखाचे लेखन जरी व्यक्तिदर्शन व व्यक्तिविषयक आंतरिक जिव्हाळा व्यक्त करण्याच्या दृष्टीने होत असले तरीदेखील कधीकधी मृत्युलेखात कथात्मकताही येते. व्यक्तीविषयक माहितीच्या तपशीलांबरोबर काळाचे संदर्भ येतात, कधीकधी मृत्युलेखकाराचे काही तर्कनिष्ठ विचारदेखील मृत्युलेखातून व्यक्त होत असतात. अर्थात हे सारे ती व्यक्ती उभी करण्याच्या प्रयत्नातच होत असते. व्यक्तीचे क्षेत्र, सांस्कृतिक वातावरण, यामुळे मृत्युलेखातील व्यक्तिमत्त्वाला जिवंतपणा येतो. त्याच पद्धतीने मृत्युलेखातून त्या व्यक्तीच्या कार्याच्या अनुषंगाने राजकीय सामाजिकतेचेही चित्रण होत असते. मृत्युलेख अमूक प्रकारच्या व्यक्तीवरच लिहावा असे बंधन नाही.

समाजातील अनेक स्तरांमधील व्यक्तींवर मृत्युलेख लिहिले जात असतात. मृत्युलेखाचे लेखन करीत असताना लेखकास पूर्णपणे अलिप्त राहूनही चालत नाही आणि वाहत जाऊनही चालत नाही. लेखन करीत असताना, व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व उभे करताना त्याला समतोल साधावा लागतो. मात्र तेंव्हा कोरडा अलिप्तपणाही कामाचा नसतो तर अलिप्त राहून लेखकास जिव्हाळा ठेवता येतो.

हा सत्याधिष्ठित वाड्.मय प्रकार असल्याने लेखकास कल्पनेच्या पातळीवरुन हा वाड्.मय प्रकार हाताळता येत नाही. लेखकाने प्रत्यक्ष पाहिलेल्या किंवा त्यास ज्ञात असलेल्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या

अनुभूतीचा अविष्कार मृत्युलेखात असतो. मृत्युलेखाचा विषय जरी ज्ञात किंवा अज्ञात व्यक्तीचे प्रत्यक्ष जीवन व तिच्या मृत्यूनंतरची स्वाभाविक हळहळ, सहानुभूती, जिव्हाळा, असा असला तरी एका अर्थाने ती नवनिर्मितीच असते. मृत्युलेख हे मृत व्यक्तीचे वाड्.मयीन श्राद्ध असते. मृत्युलेखाच्या लेखनामध्ये मृत्युलेखकाराचेही व्यक्तिमत्त्व काहीसे व्यक्त होत असते. अर्थात हे व्यक्तिमत्त्व त्या लेखनात मिसळलेले असते. त्यामुळे व्यक्तिबद्‌दल लिहित असताना कळतनकळत लेखकाचे व्यक्तिविषयक तसेच सामाजिक राजकीय विचारही व्यक्त होऊन जातात. मात्र ह्या दोन्ही बाबींचा यथोचित समतोल लेखकाला सांभाळावा लागतो. अन्यथा हे लेखन मृत्युलेख न होता निबंध होऊन बसेल. संपूर्ण मृत्युलेखात जर लेखकाचेचे स्वतंत्र विचार येऊ लागले तर मृत्युलेखाचे स्वरुप पूर्णपणे बदलून जाईल. मात्र लेखकाचे विचार येऊच नयेत असेही नाही. ते येणे स्वाभाविक आहे. पण त्यांची योजना औचित्यपूर्ण हवी. आणि मृत्युलेखात लेखकाचे विचार असेच औचित्यपूर्णपणे येत असतात. लेखक आपल्या विचारांना जास्त महत्त्व न देता मृत व्यक्तीस प्रगट करण्यासच जास्त महत्त्व देत असतो आणि त्या अनुषंगाने आपले विचार व्यक्त करीत असतो. लेखकास मृत्युलेखापासून पूर्ण अलिप्त करता येत नाही. या लेखनाचे स्वरुपच भावनिक व गंभीर असल्याने मृत्युलेखात व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक रंगांबरोबर लेखकाचे चिंतनही येते. लेखकाने चित्रित केलेल्या व्यक्तिमत्त्वास त्याच्या विचारांच्या चिंतनाची जोड मिळाल्यामुळे मृत व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावीपणे वाचकाच्या अंतःकरणास भिडते.

सत्यकथन हे मृत्युलेखाचे महत्त्वाचे सामर्थ्य आहे. त्यामुळे मृत्युलेखकार मृत्युलेखात वास्तववादी दृष्टिकोनातून लेखन करीत असतो. व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना, जीवनाला मिळालेली नवी दिशा, लेखकास त्या व्यक्तीबद्‌दल समजलेला जीवनार्थ, सामाजिक संदर्भ, यांच्या साहाय्याने मृत्युलेख लिहित असताना लेखकास अभिव्यक्तीचे फारसे स्वातंत्र्य रहात नाही. तरीदेखील या चौकटीत राहून मृत्युलेखकार त्याला व्यक्तिविषयक आकलन झालेले जीवन, गुंतागुत इत्यादींचे चित्रण करीत असतो. व जाता जाता काही अंशी भाष्यही करीत असतो.

हा लेखनप्रकार एकूणच मृत्युलेखकारास आव्हान देणार ठरतो. कारण मृत्यू हा प्रकार एकाच वेळी भावनेलाही स्पर्श करतो आणि मृत्युलेखकारास मृत व्यक्तीबद्‌दल समर्थ, अलिप्त, एकरुप व अचूक वर्णन करणेही आवश्यक असते. हे आव्हान मृत्युलेखकारास पेलावे लागते. हे लेखन त्याला अतिशय धीरोदात्तपणे करावे लागते.

तसेच मृत्युलेखकार हे लेखन जरी प्रसंगोपात करीत असला तरीदेखील हे लेखन केवळ प्रसंगोपात रहात नाही. मागच्या पिढीतील व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचे वाड्.मयीन चित्रण मृत्युलेखांच्या स्वरुपात होत असते. मग ते लेखन प्रसिद्ध व्यक्तीवर असो वा अप्रसिद्ध व्यक्तीवर असो. त्या व्यक्तीबद्‌दलचा

लेखकाचा दृष्टिकोन या लेखनातून स्पष्ट होतो. तसेच मृत्युलेख तत्कालीन भावनातिरेकातून लिहिले जात असल्याने त्यात साहजिकच झपाटलेपण येत असते.

एकंदरीत मृत्युलेख ह्या वाड्.मय प्रकारचे स्वरुप इतर वाड्.मय प्रकारांहून वरील प्रमाणे वेगळे आहे.

*** मृत्युलेख लेखनामागील हेतू :**

मृत्युलेख हा एक भावनिक वाड्.मय प्रकार असून व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिला वाड्.मयीन श्रद्धांजली वाहण्याच्या हेतूने त्यांचे लेखन होते. हे लेखन व्यक्तीसंबंधी, तिच्या मरणोत्तर लिहिले जात असल्यामुळे स्वाभाविकपणे लेखकाकडून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील काही वाईट बाजू दाखवल्या जात नाहीत. तरीदेखील गुणगौरवासाठी हे लेखन होत नसते तर मृत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवणे, तिच्या कार्याचा आढावा घेणे, स्वभावदर्शन घडवणे, एकूणच तिचे जीवनदर्शन घडविण्याच्या उद्देशाने हे लेखन होत असते. त्यामुळे भोंगळ गुणगौरवास या लेखनात स्थान असू शकत नाही. व्यक्तीच्या व्यक्तित्त्व दर्शनाबरोबर स्वाभाविकपणे तिच्याबद्दलचा गुणगौरव लेखक करीत असतो. त्यात त्याला बेगडीपणा आणून चालत नाही. व्यक्तीसंबंधीच्या खरेपणाचा मूळ धागा त्याला तोडता येत नाही. लेखकाच्या खरेखोटेपणाचा प्रत्यय या वाड्.मयप्रकारात येत असल्याने तो व्यक्तीच्या गुणांवर जास्त झोत टाकतो व त्या अनुषंगाने येणाऱ्या दोषांचाही उल्लेख करतो पण केवळ दोष दाखविण्यासाठी तो हे लेखन करीत नाही. मृत्युलेखाच्या नायकाबद्दल लेखकाचा दृष्टिकोन स्वाभाविकपणे काहीसा उदार होत असतो. गुणांचे कौतुक तो सढळपणाने करतो. याचे कारण म्हणजे 'मरणान्तानि वैराणि' या भारतीय परंपरेच्या भूमिकेतून हे लेखन होत असते. मृत व्यक्ती मृत्युलेखकाराची जिवंतपणी स्नेही असेल तर तिच्याबद्दल तो चांगले लिहितोच लिहितो पण वैऱ्याच्या किंवा विरोधकाच्या मृत्यूनंतरही त्याच्यावर मृत्युलेख लिहित असताना मृत्युलेखकाराला त्याच्या दोषांकडे काहीशी डोळेझाक करुन गुणदर्शन करावे लागते. व्यक्तीच्या मृत्यूनंतरही तिच्याशी वैर धरण्याचे काही कारण नसते.

"मृताबद्दलच्या आपल्या भावना व्यक्त करण्यास मृत्युलेखासारखे उपयुक्त साधन दुसरे क्वचितच असेल."[1] असे अनंत वामन वर्टी यांनी म्हटले आहे ते या दृष्टीने खरेच आहे. मात्र मृताबद्दलच्या फक्त भावना व्यक्त करण्यासाठीच मृत्युलेख लिहिला जात नाही तर मृत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे वाचकास दर्शन घडवणे हा मृत्युलेख लेखनाचा प्रधान हेतू असतो. व्यक्तिमत्त्व दर्शनाबरोबरच लेखक मृताबद्दल हळहळ, जिव्हाळा इत्यादी भावना व्यक्त करीत असतो. मृत

व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व दर्शनाकडे दुर्लक्ष करुन केवळ मृत व्यक्तीबद्दलच्या भावना व्यक्त करण्यासाठी लेखन केल्यास तो मृत्युलेख न होता त्याचे स्वरुप भावगीताचे होईल.

मृत्युलेखाच्या नायकाचे चरित्र रंगविण्यासाठी "मृत्यू झालेल्या व्यक्तीचा जन्मकाल, घराणे, बालपण, शिक्षण, बाललीला इत्यादींची माहिती मृत्युलेख लेखकास असावयास हवी. नायकाचे दुर्गणही गुलदस्त्यासच ठेवायचे असतात. साधल्यास त्यास सद्गुणांचा पोशाख चढवावा"[2] असेही वर्टींचे म्हणणे आहे हे म्हणणेदेखील मृत्युलेख लेखनाबाबत योग्य ठरणार नाही. व्यक्तीच्या बाललीला, बालपण इत्यादीची माहिती मृत्युलेख लेखकास असलीच पाहिजे असे नाही. कारण व्यक्तीचे कर्तृत्व फुलल्यानंतरच व्यक्तीला महत्व येत असते. शिवाय जर लेखकाच्या परिचयातील सामान्य व्यक्तीवर जर लेखकास मृत्युलेख लिहायचा असेल तर त्यास आठवणींच्या माध्यमातून पूर्णपणे स्वभावचित्रणच करावे लागते. मृत्युलेख ह्या वाङ्मय प्रकारामध्ये जन्मतारीख, घराणे यांची जंत्री देणे आवश्यक नाही. शिवाय मृत्युलेखाच्या नायकाचे दुर्गुण गुलदस्त्यात ठेवून मृत्युलेख लिहिणे कदाचित योग्य होईलही पण साधल्यास त्यास सद्गुणांचा पोषाख चढवावा' हे मृत्युलेखात होऊ शकत नाही. भारतीय परंपरेनुसार मृत्यूनंतर व्यक्तीच्या दुर्गुणाकडे आपोआपच दुर्लक्ष होते परंतु दुर्गुणास कोणीच सद्गुण म्हणणार नाही. मृत्यूचा प्रसंग गंभीर असल्याने दुर्गुण बाजूला ठेवणे हे योग्य असते.

मृत्युलेखकार मृत्युलेखाचे लेखन त्याला आकलन झालेले व्यक्तीचे जीवन व त्याचे व्यक्तीविषयक चिंतन वाचकापर्यंत पोहचविण्यासाठी करीत असतो. त्यामुळे मृत्युलेख वाचणाऱ्या प्रत्येकाला मृत व्यक्तीबद्दल स्वाभाविकपणे हळहळ वाटतेच. त्याहीपेक्षा मृत व्यक्तीचे स्मरण वाचकास घडविण्याच्या हेतूने मृत्युलेखाचे लेखन होते.

मृत्यू ही घटना दुःखद असल्यामुळे मृत्युलेखाचे लेखन देखील दुःखदच असते. जरी हे लेखन दुःखद स्वरुपाचे असले तरी "मृत्युलेख जर चटकदार वठवावयाचा असेल तर लेखकाची मनःस्थिती जितकी जास्त आनंदी असेल तितके चांगले."[3] असे अनंत वामन वर्टी 'मृत्युलेख कसा लिहावा यासंबंधी सांगतात. परंतु वर्टींचे हे म्हणणे देखील योग्य नाही. कारण एक तर दुःखद प्रसंगी आनंदी होणे अवघड. त्यामुळे लेखकास व्यावहारिक पातळीवर हे शक्य नाही. दुःखद अनुभवाचे लेखन आनंदी मनःस्थिती ठेवून लिहिणे अवघड आहे. उलट लेखकाची मनोवृत्ती ही तटस्थ, काहीशी अलिप्त पण पूर्णपणे कोरडेपणा नसलेली आणि धीरोदात्त असणे मृत्युलेखाच्या लेखनात महत्त्वाचे आहे.

मृत्युलेखात मृत्युलेखकार व्यक्तीच्या फक्त जगण्याचे किंवा मरण्याचे चित्रण करुन थांबत नाही तर तिच्या जीवनाचे व विचारांचे यथार्थ मूल्यमापन करीत असतो.

*** मृत्युलेखांची परंपरा –**

कोणताही वाङ्मयप्रकार एखाद्या समाजातील भाषेमध्ये नव्याने निर्माण होत असेल तर तो त्या समाजाची आणि काळाची गरज म्हणून निर्माण होत असतो. एखादा वाङ्मय प्रकार हा एका भाषेमधून दुसऱ्या भाषेमध्ये स्थिरावत असतो.

'मृत्युलेख' हा गद्य वाङ्मयप्रकार मराठीमध्ये इंग्रजी वाङ्मयाच्या संपर्काने आला आणि मराठीतील निबंध वाङ्मयापासून सुरू झाला. मृतव्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन, कार्याचा आढावा, तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे यातून लिहिला जाणारा मृत्युलेख हा वाङ्मयप्रकार आता आधुनिक मराठी वाङ्मयात चांगलाच स्थिरावला आहे. बहुतांशी वृत्तपत्रीय लेखनातून हा वाङ्मयप्रकार विकसित झाला असला तरी सर्वच वृत्तपत्रीय लेखनास वाङ्मयीन दर्जा असतोच असे नाही. त्यामुळेच या वाङ्मयप्रकाराच्या परंपरेचा शोध घेणे क्रमप्राप्त आहे.

मृत्युलेख हा वाङ्मयप्रकार मराठीत निबंध वाङ्मयापासून सुरू झाल्याने व निबंध वाङ्मयाचे मूळ मराठीत नसून इग्रंजी वाङ्मयात असल्यामुळे मृत्युलेख ह्या वाङ्मयप्रकारावर युरोपीय वाङ्मयप्रकाराचा पगडा असणे स्वाभाविक आहे. " कविता, कथा, नाटक या वाङ्मयप्रकारांस ब्रिटिशपूर्वक काळातील शेकडो वर्षाची संस्कृतमधील परंपरा, जशी उपलब्ध होती तशी निबंध ह्या वाङ्मयप्रकारास नव्हती.' [4] तसेच "मराठी भाषेत हिन्दुस्थानच्या पलीकडील देशांविषयी एक ओळही ब्रिटिश अमलापूर्वीच्या मराठी वाङ्मयात सापडत नाही.[5] यावरून निबंधहा वाङ्मयप्रकार मराठीमध्ये देशी नसून ब्रिटिशांबरोबर हिंदुस्थानात येऊन येथे स्थिरावला आहे हे निश्चीत होते.

मृत्युलेखाचे लेखन निबंधाच्या स्वरूपात इंग्रजी वाङ्मयात पहिल्यांदा सुरू झाले असावे. ' इंग्रजी भाषेतील पहिला नाव घेण्यासारखा निबंधकार फ्रान्सिस बेकन ( इ. स. 1561 ते 1626 ) हा असून त्याने धर्म, नीती, वाचन, मृत्यू मत्सर इ. विषयावंर प्रौढ गंभीर विषयांवर निबंध लिहिले आहेत." [6] बेकनने निबंधासाठीहाताळलेल्या विषयांमध्ये मृत्यू हा विषयदेखील येत असल्याने इंग्रजी वाङ्मयात मृत्युलेख लेखनास बेकनने सुरूवात केली असे म्हणता येईल. इंग्रजी निबंधात मृत्युलेखलेखन जरी बेकनने केले असले तरी मृत्युलेख ही संकल्पना मात्र मूळची ग्रीक संकल्पना आहे. मृत्युलेखास

'Epitaph' ही ग्रीक संकल्पना आहे. "Epitaph is a memorial inscription on a tomb stone or other monument to the dead. The term stone or other monument to the dead. The term comes from two Greek words, epi (upon) and taphas (tomb). The word also means a literary memorial compased in honour of the dead, but not intended to be inscribed on a monument. The earliest known epitaphs are those found on Equptian coffins. Celebrated epitaphs have been composed by such English writers a John Milton, Alexander pope and samael Johnson.[7]

(मृत्युलेख हा विशेषतः मृत व्यक्तीच्या स्मारकावर किंवा थडग्यावरील शीळेवर लिहिलेला लेख होय. यामध्ये बहुधा मृत व्यक्तीबद्दल आदर व्यक्त करणारे काही शब्द किंवा काव्यपंक्ती कोरल्या जातात. दोन ग्रीक शब्दांपासून ही संकल्पना आलेली आहे. 'epi' म्हणजे 'च्यावर' आणि ' taphos' म्हणजे 'Tomb' 'थडगे'. मात्र केवळ थडग्यावर कोरलेला लेख असा मर्यादित अर्थ घेता येणार नाही. मृत्युलेखाचा अर्थ मृत व्यक्तीबद्दल तिच्या स्मृतिप्रीत्यर्थ लिहिलेला एक 'वाङ्.मयीन लेख' असाही आहे. तो कोरुनच लिहीला पाहिजे असे बंधन नाही. ज्ञात असलेले सर्वात जुने मृत्युलेख इजिप्शियन शवपेटयांवर आढळतात. जॉन मिल्टन, अलेक्झांडर पोप, सेम्युल जॉन्सन या आंग्ल लेखकांनी लिहिलेले मृत्युलेख खूपच प्रसिद्ध आहेत.

ग्रीक संस्कृतीमध्ये प्रसारमाध्यमे अस्तित्वात नसतानाच्या काळात मृत व्यक्तीच्या स्मृती थडग्यावर कोरण्याची पध्दती होती. मात्र प्रसारमाध्यमांचा उदय झाल्यानंतर या पध्दतीतूनच प्रसार माध्यमांसाठी मृत्युलेख लेखनाची पध्दती रूढ झाली असावी.

इंग्रजी वाङ्.मयात शोकगीत 'Elegy' हा मृत्यूसंबंधी विचार व्यक्त करणारा काव्यप्रकार व गद्य मृत्युलेख यांचा संबंधजवळचा असावा. " Elegy is a poem that ususally reflects upon death of a friend. A well known Elegy is the English language is Thomas Grey's written in a country charchyard (1751). When Lilacs Last in the Door

yard Blomed (1865) by waH whitman is another. Lord Tennyson's in Memoriam (1850) is a series of elegies in which the poet reconciles himself to the loss of his friend Arthur Henry Hallam.

Postral elegies present the departed friend and the mourning poes as shepher's Examples of postoral elegies include Edmund Spenser's Astrophel (1595) on Sir Philip Sidney's death - John Milton's Lycides (1637) on Edward Adonais (1821) on John Keats death and Matthew Arnolds 'Thyrsis (1867) on Arthur Hugh Clough's death.

The ancient Greeks used the term elegy to refer to a poem's from rather than to its subject matter. Most ancient Greek and Roman elegies deal with war and love rather than with death" . शोकगीत हा काव्यप्रकार साधारणपणे मृत्यूवरील (मृत्यूसंबंधी) विचार व्यक्त करतो. ब-याच वेळा मित्राचा मृत्यू. इंग्रजी भाषेतील सुप्रसिद्ध शोकगीतांमध्ये थॉमस ग्रे यांच्याElegy written in a country churchyard (1751), वॉल्ट व्हिटमन यांची 'When Lilacs last in the Dooryed Bloomed (1865) लॉर्ड टेनसिन यांच्या In Memoriam (1850) या कवितांचा समावेश होतो. टेनसिन यांची कविता ही एक शोकगीतांची मालिका आहे. त्यात कवीचे मित्र आर्थर हेन्री हॅलम यांच्या मृत्यूनंतरच्या परिस्थितीशी कवी स्वतःचे सांत्वन करुन घेतो.

ग्रामीण शोकगीतांमध्ये मृत्यू झालेला मित्र आणि त्याबद्दल शोक करणारा कवी हे साधारणपणे धनगर म्हणून दाखवले जातात. ग्रामीण शोक गीतामंध्ये एडमंड स्पेन्सर यांच्या सर फिलीप सिडने यांच्या मृत्यूवर लिहिलेल्या 'Astrophel' (1595) या कवितेचा तसेच एडवर्ड किंग यांच्या मृत्यूवर लिहिलेल्या जॉन मिल्टन यांच्या 'Lycidas' (1637) चा जॉन किटस यांच्या मृत्यूवर शेली यांनी लिहिलेल्या 'Adonais' (1821) चा (1821) आणि आर्थर यू क्लवो यांच्या मृत्यूवर मॅथ्यू अरनोल्ड यांनी लिहलेल्या 'Thyrsis' (1867) या कवितांचा समावेश होतो.

प्राचीन ग्रीकलोक 'Elegy' हा शब्द प्रयोग कवितेच्या विशिष्ट आकृतीबंधासाठी वापरत असत. त्याचा सध्याचा विषय तेव्हा ते विचारात घेत नसत. अत्यंत प्राचीन ग्रीक आणि रोमन शोकगीते युद्ध आणि प्रेम या विषयांशी संबंधित आहेत. मृत्यूशी नाही.)

या विवेचनावरुन शोकगीत व मृत्युलेख यांच्या अभिव्यक्तीत फरक असला तरी अनुभूतीत मात्र साम्य आहे हे स्पष्ट होते. हा इंग्रजी गद्य वाङ्मय प्रकार इंग्रजांच्या राजवटीबरोबर जे इंग्रजी वाङ्मय व शिक्षण भारतात आले त्या पार्श्वभूमीवर मराठी निबंध वाङ्मयात निबंधाच्या स्वरुपात लिहिला जाऊ लागला. विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक, शि. म. परांजपे, अच्युतराव कोल्हटकर, न. चिं. केळकर इत्यादी निबंधकारांनी जे विचारप्रेरक, कल्पनाप्रधान, साहित्यविवेचक, व्यक्तिगुण गौरवात्मक निबंध लिहिले यातच मराठी वाङ्मया"मधील मृत्युलेखांचे मूळ आहे. वृत्तपत्र व नियतकालिकांच्या प्रसारांबरोबर ह्या वाङ्मय प्रकाराचा विकास झालेला दिसून येतो. कालवश झालेल्या व्यक्तीचे स्मरण करण्यासाठी वृत्तपत्र व नियतकालिकांमधून हे प्रसंगोपात लेखन झाले. "मरणान्तानि वैराणी' ही आपली सांस्कृतिक परंपराच आहे. या परंपरेचे निदर्शक म्हणजे लो. टिळकांचे मृत्युलेख. प्रार्थना समाजी मताचे वसंतराव नाईकही नेहमी म्हणत असत. 'व्यक्ती वारल्यानंतर बळवंतरावांचे मृत्युलेखातील मूल्यमापन अगदी चोख असते. 'आगरकर, न्या. रानडे, ना. गोखले यांच्यावरील अग्रलेख ही याची उदाहरणं. केळकर चौकस नि लालित्याचे भोक्ते. त्यांचे मृत्युलेख साहित्यगुणांसाठी वाखाणले जात"[9] टिळकांनी आपल्या 'केसरी' या वृत्तपत्रासाठी मृत व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यासाठी लिहिलेल्या अग्रलेखांचे स्वरुप मृत्युलेखांचेच आहे. तसेच अच्युतराव कोल्हटकर हे पत्रकारितेतील वाखाणण्याजोगे व्यक्तिमत्व होय. 'अच्युत बळवंतानी लो. टिळकांच्या हयातीतच विलक्षण लोकप्रियता मिळवली ती त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनातील वेधकतेने आणि नव्या क्लुप्त्या योजून दैनिक वृत्तपत्र सामान्य माणसांपर्यंत पोचविण्याचा किमयेने"[10] "शेवटची वेल सुकली" या नावाचा त्यांचा एक अप्रतिम लेख दैनिक 'संदेश' च्या 2 सप्टेंबर 1917 च्या अंकातून प्रसिद्ध झाला आहे. पेशव्यांच्या घराण्याची शेवटची एकूलती एक व्यक्ती निधन पावल्याचे वृत्त देताना त्यांच्या मनामध्ये जे नाना त-हेचे भावतरंग उठले त्यांना अच्युतरावांनी शब्दरुप दिले आणि त्यातून वाचकांचे अंतरंग "हेलावणारा हा नितांत सुंदर ललित लेख निर्माण झाला".[11] तसेच 'लोकमान्यांचा स्वर्गवास' हा लो. टिळकांवरील अचुतरावांचा मृत्युलेख महत्त्वपूर्ण आहे. अच्युतरावांच्या संपादकीय लेखनाच्या चमत्काराचा गौरव करताना टिळकांवर अच्युतरावांनी लिहिलेल्या मृत्युलेखाबद्दल अत्रे लिहितात, लोकमान्यांच्या मृत्यूवर अनेक वृत्तपत्रांनी त्यावेळी अग्रलेख लिहिले असतील. पण अच्युतराव कोल्हटकरांनी आपल्या 'संदेश' पत्रात जो बत्तीस स्तंभी अग्रलेख त्यांच्या

तेराव्या दिवशी लिहिला तसा मृत्युलेख अद्याप मराठी भाषेत तरी कोणी लिहिलेला नाही".[12] अच्युतरावांना गुरुस्थानी मानून अत्र्यांनी पत्रकारितेत आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवला. आचार्य अत्र्यांनी आपल्या 'मराठा' या दैनिकातून व 'नवयुग' या साप्ताहिकातून लिहिलेले कित्येक मृत्युलेख खास वठले आहेत. मृत्युलेख लेखनामध्ये अत्र्यांचा हातखंडा होता. अत्र्यांनी लिहिलेले कित्येक मृत्युलेख विलोभनीय झाले आहेत. त्यांनी फक्त प्रसिद्ध व्यक्तींवरच मृत्युलेख लिहिले असे नाही तर त्यांच्या गाडीच्या 'बाबू' ड्रायव्हरपासून ते आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कित्येक महनीय व्यक्तींवर त्यांनी यशस्वी मृत्युलेख लेखन केले आहे.

इंग्रजी वाङ्मयातून हा लेखन प्रकार जरी मराठीत आला असला तरी आधुनिक मराठी वाङ्मयात चांगलाच स्थिरावला आहे. हे लेखन जरी वृत्तपत्रीय असले तरी सर्वच वृत्तपत्रीय लेखनाला वाङ्मयीन दर्जा असतोच असे नाही. मराठी वाङ्मयामध्ये मृत्युलेख ह्या वाङ्मयप्रकारची सुरुवात जरी निबंध वाङ्मयापासून झाली असली तरी त्याला आचार्य अत्रे यांनी वाङ्मयीन प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली आहे. अत्र्यांमुळे ह्या वाङ्मयप्रकारास प्रतिष्ठा लाभली आहे. इतके ह्या वाङ्मयप्रकाराशी अत्र्यांचे एकजिनसीत्व आहे. असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

*** मृत्युलेख आणि इतर वाङ्मयप्रकार यांचा संबंध :-**

मृत्युलेख हा वाङ्मयप्रकार व्यक्तिनिष्ठ असून व्यक्तीच्या जीवनातील नानाविध पदर यात गुंतलेले असतात. त्याच बरोबर मृत्युलेख लेखकाची भावनिकताही यात चित्रित झालेली असते. मृत्युलेखकार मृत्युलेखाच्या नायकाचे जीवनदर्शन घडवित असताना जाता जाता त्याची वैयक्तिक अनुभूतीही नोंदवत असतो. ह्या वाङ्मयप्रकारात काही इतर वाङ्मय प्रकारांचीही वैशिष्टये आढळतात. तरीदेखील ह्या वाङ्मयप्रकाराचे स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून स्थान मान्य करावे लागते. हा वाङ्मय प्रकार निबंध वाङ्मयातून विकसित झाला असल्याने निबंध ह्या वाङ्मय प्रकारची काही वैशिष्टये मृत्युलेखात दिसून येतील. तर मृत्युलेख हा व्यक्तीच्या मरणोत्तर तिचे थोडक्यात चरित्र सांगण्याच्या उद्देशाने लिहिला जात असल्याने चरित्राचीही काही वैशिष्टये त्यात येतील. मृत्युलेखात प्रसंगचित्रण, घटना प्रधानता, कथात्मकता याही बाबी येत असल्याने कथेतील काही वैशिष्टये या वाङ्मयप्रकारात येतील. व्यक्तीचित्र व मृत्युलेख यांचा तसा जवळचा संबंध असल्याने व्यक्तिचित्राची वैशिष्टयेही या वाङ्मय प्रकारात येणे क्रमप्राप्त आहे. यासाठी मृत्युलेखाशी संबंधित काही वाङ्मयप्रकार व मृत्युलेख हा वाङ्मयप्रकार यांचा संबंध पुढीलप्रमाणे तपासून पाहता येईल.

*** मृत्युलेख आणि चरित्र –**

मृत्युलेख आणि चरित्र हे दोन्ही वाङ्मयप्रकार विशिष्ट व्यक्तीस केंद्रस्थानी धरुन लिहिले जाणारे गद्य वाङ्मयप्रकार आहेत. दोन्ही वाङ्मय प्रकारांमध्ये लेखक एका विशिष्ट व्यक्तीविषयी निवेदन करीत असतो. असे असूनदेखील मृत्युलेख व चरित्र या वाङ्मयप्रकारांमध्ये काही साम्यभेद आढळतील.

पहिला भेद असा की, मृत्युलेख व चरित्र या वाङ्मय प्रकारांमध्ये जरी व्यक्ती केंद्रस्थानी मानून चित्रण होत असले तरी देखील चरित्रातील व्यक्ती जिवंत किंवा मृत असू शकते. मात्र मृत्युलेख हा मृत झालेल्या व्यक्तीवरच लिहिला जात असतो. हा दोन्हींमधील ढोबळ फरक होय. तसेच चरित्राचा विस्तार प्रदीर्घ असतो तर मृत्युलेखाचा विस्तार आटोपशीर असतो.

अनुभूतीच्या बाबतीत मृत्युलेख व चरित्र यामधील अनुभूती एकविध असतो. असे असले तरी, "चरित्राचा संबंध व्यक्तीच्या जीवनाशी, त्या जीवनातून आकार घेणा–या व्यक्तिमत्त्वाशी आहे. व्यक्तीजीवन जगत असताना प्रकट होणा–या राग, द्वेष, प्रेमदंभ, आदी मनोविकारांशी आहे. मानवी जीवनातील ह्या शाश्वत भागाच्या चित्रणामुळे चरित्राचे वाङ्मयीन रुप उजळून निघते. जीवनदर्शनामुळे चरित्राला वाङ्मयीन घाट येतो. भावजीवनाच्या अविष्कारामुळे चरित्राला कथेचे परिमाण लाभते. व्यक्तिजीवनातील संघर्षाच्या चित्रणामुळे चरित्र चित्तवेधक होते. साहजिकच व्यक्तीची महत्त्वाकांक्षा, यशापयश, सुखदुःख आणि भोवतालच्या परिसर आदी गोष्टीतून घडत जाणारे व्यक्तिमत्त्व चित्रित करणे हे चरित्राचे वाङ्मयीन उद्दिष्ट ठरते."[13] अर्थात हे लेखन करीत असताना चरित्रकार जितक्या अलिप्तपणे चरित्रलेखन करील तेवढे चरित्र नायकाच्या जीवनाचे वास्तव चित्रण करु शकतो. त्याचे चरित्र नायकाच्या कर्तृत्वासंबंधी स्वतः भाष्य न करणे अधिक योग्य ठरते. मात्र मृत्युलेख हा जरी चरित्राचाच एक भाग असला तरी मृत्युलेख लेखक मृत्युलेखातील नायकाच्या जीवनाशी पूर्णपणे अलिप्त राहू शकणार नाही. कारण त्या व्यक्तीचा मृत्यू मृत्युलेख लिहिणा–यास भावल्याने स्वाभाविकपणे तो त्याच्या बाजूस काहीसा का होईना झुकत असतो. त्याच्या गुणांचे गुणगान तर तो करतोच पण दोषांकडे उदारमतवादी दृष्टीने पाहतो. चरित्र लेखक चरित्रामधून त्या व्यक्तीच्या एकंदरीत व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवत असतो. त्या अनुषंगाने व्यक्तीच्या जीवनातील महत्वाचे प्रसंग, स्वभावदर्शन, तिचे समाजामधील असलेले स्थान. ह्या बाबींची तो दखल घेत असतो. मृत्युलेखकारालाही ह्या बाबींची दखल घ्यावी लागते. "चरित्रकाराला व्यक्तीचे जीवन आपल्या मनाप्रमाणे घडविता येत नाही."[14] तसेच मृत्युलेखकारादेखील मृत्युलेखाच्या नायकाचे जीवन मनाप्रमाणे घडविता येत नाही. मात्र गुणगौरवाचा भाग मृत्युलेखात स्वाभाविकपणे येत असतो. चरित्रलेखकास चरित्र नायकाच्या जीवनाचा पूर्ण अभ्यास करुन चरित्र लिहिण्याएवढा अवधी

त्याच्याजवळ असतो. मात्र मृत्युलेखकारास तेवढा अवधी मिळत नसल्याने त्याला व्यक्तीसंबंधी माहित असलेल्या बाबींवरच हे लेखन खुलवून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवावे लागते. "व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तीचे वेगळेपण सिद्ध करणाऱ्या व्यक्तिविशेषांची एकात्म परिणती"[15] ही परिणती देण्याचा मृत्युलेखककार प्रयत्न करीत असतो व व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व उभे करीत असतो. व्यक्तिमत्त्व दर्शनामुळे चरित्र व मृत्युलेख ह्या वाङ्‌मय प्रकारामध्ये आशयाच्या दृष्टीने साम्य आहे पण विस्तार व अभिव्यक्तीच्या दृष्टीने दोन्ही वाङ्‌मयप्रकार वेगळे ठरतात. त्यामुळे मृत्युलेख हा वाङ्‌मय प्रकार चरित्र या वाङ्‌मय प्रकाराहून निराळा आहे.

*** मृत्युलेख आणि व्यक्तिचित्र –**

मृत्युलेख आणि व्यक्तिचित्र ह्या दोन्ही वाङ्‌मय प्रकारांमध्ये विस्तार व आशयाच्या दृष्टीने बरेचसे साम्य असते. व्यक्ती उभी करणे हाच दोन्ही वाङ्‌मय प्रकारामागील मुख्य हेतू होय. स्वरुपाच्या दृष्टीनेही मृत्युलेख व व्यक्तिचित्रात बरेचसे साम्य आहे. तरीदेखील मृत्युलेखास व्यक्तिचित्र असे म्हटले जात नाही. त्यामुळे मृत्युलेख व्यक्तिचित्रांहून वेगळे पडतात. मृत्युलेख हा वाङ्‌मयप्रकार व्यक्तिनिष्ठ असल्याने त्यास पूर्णपणे व्यक्तीसच महत्त्व असते. व्यक्तिचित्र हाही वाङ्‌मयप्रकार व्यक्तिनिष्ठ असल्याने त्यातही व्यक्तीसच महत्त्व असते. मात्र व्यक्तिगत हळहळ, गुणांचा थोडाफार अधिक गौरव ह्या बाबी मृत्युलेखात आढळतात याचे कारण मृत्युलेखातील व्यक्ती मृत असते. मात्र व्यक्तिचित्रातील व्यक्ती जिवंत असते.

व्यक्तिचित्रामध्ये त्या व्यक्तीच्या सहवासातील आठवणी, प्रसंग यांच्यापेक्षा त्या व्यक्तीच्या व्यक्तिदर्शनाला अधिक महत्त्व असते. यासाठी व्यक्तिचित्र लेखकास व्यक्तीचे निरीक्षण बारकाईने करावे लागते. हे मृत्युलेखाच्या बाबतीतही करावे लागतेच. पण व्यक्तिचित्रात न येणारा काही भाग मृत्युलेखात येतो. तो म्हणजे मृत व्यक्तीविषयीची सहानुभूती, वैयक्तिक हळहळ, तसेच मृत्युलेखकार मृत व्यक्तीच्या एकूण कार्याचा व जीवनाचा आढावा घेऊन त्यावर भाष्य करीत असतो. व्यक्तिचित्र व्यक्तीसमोर ठेवून तिच्या व्यक्तिमत्वातील खुबी, गुणदोष, स्वभाव ध्यानात घेऊन लिहिले जात असते. मृत्युलेखकारही मृत्युलेखात विशिष्ट व्यक्तिविषयक अनुभव व्यक्त करीत असतो. मात्र मृत्युलेखात अनुभव व्यक्त करीत असताना तो भावनिक पातळीवरुन अधिक चित्रण करतो. व्यक्तीचा मृत्यू त्याच्या मनाला भावला असल्यामुळे तो त्या अनुभवाशी पूर्णतः तटस्थ राहू शकत नाही.

व्यक्तिचित्र हा जरी मृत्युलेखाच्या जवळचा वाङ्‌मयप्रकार असला व दोन्ही वाङ्‌मय प्रकारांमध्ये शब्दांच्या माध्यमातून व्यक्तीचे चित्रण होत असले तरी देखील व्यक्तिचित्र हा व्यक्तीच्या जीवनाचा जीवनव्यापी आढावा असत नाही. विशिष्ट घटना, प्रसंग यांच्या अनुषंगाने व्यक्तीचे

व्यक्तिमत्त्व त्यात चित्रित केलेले असते. मृत्युलेख व व्यक्तिचित्र ह्या दोन्ही वाङ्‌मय प्रकारातील कलानुभव व्यक्तीचे जीवन हाच असतो. ह्या दृष्टीनेदेखील ह्या दोन्ही वाङ्‌मय प्रकारांमध्ये साम्य असले तरी व्यक्तिचित्रात लेखकाचा भर व्यक्तीचे हुबेहुब स्वभावचित्रण करण्यावर असतो. त्या अनुषंगाने तिच्या कार्याचाही उल्लेख येऊन जातो. मृत्युलेखातही व्यक्तीलाच महत्व असते. दोन्ही ठिकाणी लेखक व्यक्तीशी समरस झालेला असतो. मात्र कधीकधी व्यक्तीशी समरस न होता केवळ औपचारिकतेच्या भूमिकेतून जेंव्हा मृत्युलेख लिहिला जातो तेंव्हा तो यशस्वी होत नाही. तो मृत व्यक्तीबद्‌दल धीरोदत्तपणे भाष्य करीत असतो व तिच्या जीवनातील जीवनमूल्यांचे दर्शन घडवित असतो.

"शब्दचित्र रेखाटताना लेखकाने ते जितक्या प्रमाणात अलिप्तपणे रेखाटण्याचा प्रयत्न केलेला असेल तितक्या प्रमाणात त्याची परिणामकारकता वाढलेली असते."[16] हे व्यक्तिचित्र (शब्दचित्र) ह्या वाङ्‌मय प्रकाराबाबत योग्य आहे. पण मृत्युलेखात मात्र लेखकाचे भावगांभीर्यही व्यक्त झालेले असते. व्यक्तिचित्र हे व्यक्तिदर्शनासाठी लिहिले जाते. मृत्युलेखाचेही लेखन व्यक्तिदर्शनासाठीच होत असले तरी मृत्युलेखात बराचसा औपचारिक भाग येत असतो. जो व्यक्तिचित्रात नसतो. दुसरी गोष्ट म्हणजे व्यक्तिचित्राचे उद्‌दिष्ट केवळ व्यक्तिदर्शन हेच असल्याने त्यात कथात्मकता किंवा एखादा तर्कनिष्ठ विचार येत नाही. मृत्युलेखात मात्र कथात्मकता येऊ शकते. लेखकाचे तर्कनिष्ठ विचारही व्यक्त होत असतात. मृत्युलेखात असणारी व्यक्तिविषयक चिंतनशीलतेची खोली व्यक्तिचित्रात कमी असते व मृत्युलेखात जास्त असते.

मृत्युलेख व व्यक्तिचित्र यांच्यामध्ये आशयाच्या दृष्टीने काहीसे साम्य असले तर अभिव्यक्तीत फरक आहे. त्यामुळे मृत्युलेखास व्यक्तिचित्राचा उपप्रकार वगैरे म्हणता येणार नाही. व्यक्तिचित्रात लेखक व्यक्तीच्या जीवनाचे वास्तव दर्शन घडविण्याचा प्रयत्न करीत असतो. तर मृत्युलेखात ह्या वास्तव दर्शनाबरोबर व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाबद्‌दल काहीसा उदारमतवादी दृष्टिकोन असतो. मात्र केवळ उदोउदो करण्याच्या उद्‌देशाने हे लेखन केले जात नाही. तो लेखनात समतोल साधून शब्दांच्या प्रवाहात वाहात न जाता व्यक्ती उभी करुन तिच्याबद्‌दल काहीसे भाष्य करीत असतो. मृत व्यक्तीच्या एकंदरीत जीवनाचे यथार्थ मूल्यमापन मृत्युलेखकार करीत असतो.

वरील विवेचनाआधारे व्यक्तिचित्र हा वेगळा वाङ्‌मय प्रकार आहे व मृत्युलेख हा वेगळा वाङ्‌मय प्रकार आहे असे म्हणावेच लागेल.

*** मृत्युलेख व निबंध –**

मृत्युलेख हा गद्य वाड्.मयप्रकार निबंध वाड्.मयातूनच विकसित झालेला असल्यामुळे मृत्युलेख निबंधाच्या जवळचा वाड्.मय प्रकार आहे. हा वाड्.मय प्रकार इंग्रजी वाड्.मयातून मराठीत आला असल्याने व मृत्युलेख हाही वाड्.मयप्रकार इंग्रजीतूनच मराठीत आला असल्याने याचे मूळ इंग्रजी निबंध वाड्.मयात सापडते. इंग्रजी वाड्.मयातील पहिला नाव घेण्यासारखा निबंधकार फ्रान्सिस बेकन याचे निबंध, धर्म, नीती, वाचन, मृत्यू, मत्सर इ. विषयांवर आधारित असल्याचे मृत्युलेखांची परंपरा पहात असताना आपण पाहिलेच आहे. त्यामुळे निबंध हा वाड्.मय प्रकार व मृत्युलेख हा वाड्.मय प्रकार यांचा संबंध पाहात असताना मृत्युलेखात निबंध वाड्.मयाची काही वैशिष्टये दिसून येतात. हे दोन्ही वाड्.मय प्रकार वृत्तपत्राच्या माध्यमातून विकसित झाले आहेत. वैचारिकता हा निबंधाचा मूळ स्त्रोत असतो. एखाद्या विशिष्ट विषयासंबंधीचे लेखकाचे प्रौढ चिंतन, विचार, भावना, अनुभव निबंधामधून व्यक्त होत असतात. निबंध हा जीवनाशी संबंधित वेगवेगळया विषयांवर लिहिलेला असतो. विचार-प्रेरक, कल्पनाप्रधान, साहित्यविवेचक, व्यक्तिगुण गौरवात्मक, वर्णनात्मक इत्यादी अनेक प्रकारचे विषय निबंधात येत असतात. यातील व्यक्ति गुणगौरवात्मक निबंध व मृत्युलेख यांचा संबंध जोडता येईल. निबंध वस्तुनिष्ठ पद्धतीने उलगडत जातो. जर तो व्यक्तीशी संबंधित असेल तर व्यक्तिनिष्ठ होतो. मृत्युलेख हा देखील व्यक्तिनिष्ठच असतो. निबंधामधील विषयाचे प्रतिपादन सूत्रबद्ध व तर्कशुद्ध असते. यातच निबंधकाराचे अनुभव, चिंतन, भावानुभूती यांचे दर्शन घडते. मृत्युलेखातही मृत व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिपादन मृत्युलेखकार करीत असतो. त्या अनुषंगाने तो त्याचे त्या व्यक्तिविषयीचे अनुभव, चिंतन, भावानुभूती व्यक्त करीत असतो. असे निबंध व मृत्युलेख यांच्यामध्ये जरी साम्य असले तरीदेखील अंतिम परिणामाच्या दृष्टीने विचार करता दोन्ही वाड्.मयप्रकार भिन्न ठरतात. निबंध लेखकाच्या वैचारिकतेच्या अनुषंगाने उलगडत जातो. एखाद्या विषयावर निबंधकार आपल्या चिंतनशीलतेने साधक बाधक विचार मांडत विशिष्ट तर्कावर येऊन पोहोचत असतो. मृत्युलेखकार मृत्युलेखातून मृत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवत असताना तो स्वतःही हळहळ व्यक्त करीत जातो. मृत्युलेखामध्ये निबंधा प्रमाणे केवळ वैचारिक पातळीवरुन शुष्कपणे, तटस्थपणे निरुपण केलेले नसते. तर ते निरुपण जीवनमूल्यांचा शोध घेण्यासाठी आलेले असते. व्यक्तिविषयक आठवणी, भावना नमूद करीत वाचकांच्या भावनांनाही तो आव्हान करीत असतो. मृत्युलेखातून वाचकास मृत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाबरोबरच मृत्युलेखकाराचे त्या व्यक्तिविषयीचे विचार, चिंतन, भावना यांचा प्रत्यय येतो. त्यामुळे मृत्युलेख हा वाड्.मय प्रकार जरी

निबंध वाङ्‌मयातून विकसित झाला असला व त्याचे स्वरुप निबंधसदृश्य असले तरी मृत्युलेखांस निबंध असे संबोधणे योग्य होणार नाही.

* **मृत्युलेख व कथा –**

कथा ह्या वाङ्‌मय प्रकाराशी मृत्युलेख वाङ्‌मय प्रकाराचा असणारा संबंध पडताळून पाहताना असे दिसून येते की, व्यक्तिकेंद्रित कथा व मृत्युलेख यांच्या सीमारेषा एकमेकांत मिसळलेल्या आढळतात. कथेमध्ये असणारे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे कथात्मकता. ही कथात्मकता एका व्यक्तीच्या संदर्भातही असू शकते. त्यामुळे मृत्युलेखामध्ये जर त्या मृत व्यक्तीच्या अनुषंगाने कथात्मकता, घटना प्रधानता, प्रसंगचित्रे, संघर्ष भोवतालची परिस्थिती हे घटक मृत्युलेखकाराने चित्रित केले असतील तर तो मृत्युलेख कथावजा होऊ शकतो. उदा. आचार्य अत्रे यांचे 'महापुरात बुडालेला विष्णू' 'वसंत मालती' हे मृत्युलेख कथावजा आहेत. कारण त्यांच्यामध्ये पात्रचित्रण, घटनाप्रधानता, संघर्ष, कथात्मकता, भोवतालची परिस्थिती यांचे चित्रण आलेले आहे. त्यामुळे व्यक्तिकेंद्रित कथा व मृत्युलेख यांच्यात साम्य असते.

मात्र कथा व मृत्युलेख यांच्या अविष्काराची पद्धती भिन्न असते. एखादा मृत्युलेख कथासदृश्य वाटत असला तरी तो कथासदृश्य झाल्यामुळे तसा वाटतो. अन्यथा त्याचे लेखन मृत्युलेख म्हणूनच झालेले असते. कथा म्हणून नव्हे. "कोणतीही कलाकृतीही संमिश्र स्वरुपाची असते. कलाकृती ही अनुभवांची संघटना असते."[17] त्यामुळे मृत्युलेखात कथात्मकता येऊ शकते. शिवाय कथेमध्ये मुख्य कथानकाच्या अनुषंगाने इतर पत्रांचेही चित्रण कथाकार करीत असतो. मात्र मृत्युलेखात मृत्युलेखकाराची भूमिका ही भाष्यकाराची असते. तो मृत व्यक्तीचे जीवनचरित्र सांगत असताना तिच्यावर स्वतः भाष्य करीत असतो. त्या व्यक्तीशिवाय इतर पात्रांना मृत्युलेखात वाव नसतो. मृत्युलेख हा वाङ्‌मयप्रकार व्यक्तिनिष्ठ असल्यामुळे त्यात पूर्णपणे व्यक्तीलाच महत्त्व असते. कथेमध्ये कथाकार ज्या विषयावर कथा लिहित असतो त्या अनुषंगाने व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण येते. कथाकार सर्वांगाने व्यक्तीचे चित्रण करीत नाही. व्यक्तिमत्त्वातील एखाद्या पैलूच्या सहाय्याने तो चित्रण करीत असतो. मात्र मृत्युलेखात व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व अंगाना स्पर्श करण्याचा लेखकाचा प्रयत्न असतो. कथाकार व्यक्तिजीवनातील त्याला भावलेल्या एखाद्या घटनेच्या अनुषंगाने चित्रण करीत असतो. तिच्यात जीवनव्यापी आढावा नसतो. मानवी जीवनातील एक प्रसंग हादेखील कथेचा विषय होऊ शकतो. परंतु मृत व्यक्तीच्या जीवनातील एखाद्याच प्रसंगावर मृत्युलेखकारास मृत्युलेख लिहिता येणार नाही. खुलवता येणार नाही. कथेत व्यक्तिजीवनातील एका भागाचे चित्रण येते तर मृत्युलेखात

व्यक्तीच्या जीवनाचा जीवनव्यापी आढावा असतो. विस्ताराच्या दृष्टीने दोन्ही वाङ्.मय प्रकारांमध्ये साम्य असले तरी आवाक्याच्या दृष्टीने मात्र भेद असतो. कथेचा आवाका थोडासाच असतो. मात्र तेवढयाच विस्तारात मृत्युलेखात व्यक्तीवर पूर्णपणे लक्ष केंद्रित झाल्याने मृत्युलेखाचा आवाका जास्त असतो. "कथेत केवळ पात्रांच्या जीवनाची एखादी झलक पहावयास मिळते. त्यातून चरित्राचा पूर्ण विकास दाखविलेला नसतो. तर एखाद्या अंगाचे त्यातून दर्शन घडविलेले असते. अशावेळी कथाकार आपल्या कथागत पात्रांची स्पष्टीकरणात्मक जीवनभाष्ये करीत नसतो. तर केवळ त्यांचा इशारा करीत असतो."[18] त्यामुळे कथेच्या तुलनेत मृत्युलेख हा वाङ्.मयप्रकार भिन्न आहे.

कथेमध्ये येणारी पात्रे जरी कथाकाराने प्रत्यक्ष जीवनात पाहिलेली असली तरी त्यांचे चित्रण करीत असताना कथाकाराच्या कल्पनाशक्तीला बराचसा वाव असतो. त्याने घेतलेला जीवनानुभव कथानुभवाच्या चौकटीत बसवीत असताना त्याला त्यात बदल करण्याचे स्वातंत्र्य असते. तो कथानुभव पूर्णपणे वास्तववादी दृष्टीने रेखाटत नाही. त्यात त्यांच्या कल्पनांचे रंग तो भरतो. तो त्याला हवे तसे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वात बदल करुन घेतो. त्यामुळे कथेला सत्याची कसोटी लावता येत नाही. कथाकाराचा अनुभव कदाचित वास्तव असेलही पण त्याचे चित्रण मात्र कल्पित असते.

मृत्युलेखाचे लेखन मृत झालेल्या प्रत्यक्ष व्यक्तीवर होत असल्याने त्यात व्यक्तीचे सत्य जीवनदर्शन येत असते. मृत्युलेखकारावर सत्यकथनाचे बंधन येते. त्याच्या कल्पनाशक्तीस वास्तवाच्या मर्यादा पडतात. तो व्यक्तिविषयक सत्य अनुभवाच्या चौकटीत कशाप्रकारे मृत्युलेख खुलवतो यावरच मृत्युलेखाचे यश अवलंबून असते. यासाठी मृत्युलेखकाराने मृत व्यक्तीच्या एकंदरीत व्यक्तीमत्वाचा शोध घेतलेला असतो. मृत्युलेखकार त्याने अनुभवलेली व्यक्ती सत्याची कास न सोडता शब्दबद्ध करीत असतो व त्या व्यक्तीबद्दलच्या त्याच्या भावना, विचार, तत्कालीन विचारप्रणाली, आठवणी यांच्या सहाय्याने मृत्युलेख खुलवत असतो.

कथेतील व्यक्ती ही त्या लेखकाची मानसपुत्र असल्यामुळे त्या व्यक्तीबद्दल त्याला सर्व काही ज्ञात असते. ती व्यक्ती कशी रंगवावी हे लेखकाने ठरवलेले असते. मात्र मृत्युलेखाच्या बाबतीत असे नसते. ज्या व्यक्तीवर मृत्युलेख लिहायचा त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे सर्व पैलू लेखकाला माहित असतातच असे नाही त्यामुळे मृत्युलेख लेखकास अपलब्ध माहितीवरच मृत्युलेख खुलवावा लागतो.

कथेत संज्ञा प्रवाहाला वाव असतो तसा मृत्युलेखात संज्ञा प्रवाहाला वाव नसतो.

मृत्युलेख हे मृत व्यक्तीचे वाङ्‌मयीन श्राध्द असते. मृत व्यक्ती जिवंत असताना जर मृत्युलेखकारास तिचा सहवास लाभला तर मृत्युलेख जिवंत होतो. अन्यथा त्या व्यक्तीबद्दलचा मृत्युलेखकाराचा त्या व्यक्तीचा स्वभाव, सवयी, कार्य, यांच्यासह सूक्ष्मअभ्यास तरी हवा तरच त्याला मृत्युलेख लिहिता येईल.

मृत्युलेखाचे स्वरूप कधीकधी कथात्मक होत असले तरी देखील ह्या वाङ्‌मय प्रकाराशी कथा ह्या वाङ्‌मयप्रकाराची जवळीक असूनदेखील मृत्युलेख ह्या वाङ्‌मयप्रकाराचे वेगळेपण मान्य करावयास हवे. अर्थातच कथेतील काही घटक मृत्युलेखात समाविष्ट होत असेल तरी मृत्युलेख म्हणजे कथा नव्हे.

### * मृत्युलेखाचे प्रकार

मृत्युलेख हा संमिश्र वाङ्‌मय प्रकार आहे. हा वाङ्‌मय प्रकार सत्याधीष्ठित असल्यामुळे काही सत्याधिष्ठित इतर वाङ्‌मय प्रकारांमधील घटक ह्या वाङ्‌मय प्रकारात मिसळले आहेत. शिवाय हा वाङ्‌मयप्रकार वृत्तपत्राच्या माध्यमातून विकसित झालेला असल्यामुळे त्याचे स्वरूप बरेचसे अग्रलेखवजा व निबंधवजा झालेले आहे. अभिव्यक्तीच्या दृष्टीने मृत्युलेखांचे प्रकार पुढील प्रमाणे संबोधता येतील.

1. अग्रलेखवजा मृत्युलेख
2. व्यक्तिचित्रपर मृत्युलेख
3. कथासदृश मृत्युलेख
4. निबंधसदृश मृत्युलेख

**1. <u>अग्रलेखवजा मृत्युलेख –</u>** वृत्तपत्रकार हा बहुअवधानी असावा लागतो. समाजातील सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय पार्श्वभूमीवर वृत्तपत्रकार अग्रलेखामधून विचार मांडत असतो. यामध्येच समाजातील एखदया मान्यवर व्यक्तीचा किंवा लेखकाच्या जिव्हाळयातील एखादया सामान्य व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्या व्यक्तीस महत्त्व देवून लिहिलेला लेख म्हणजे मृत्युलेख. तो लेखवृत्तपत्रासाठी लिहिलेला असल्यामुळे साहजिकच त्याचे स्वरूप अग्रलेखाचे असते. अग्रलेखात तात्कालीन घडामोडींचे प्रतिबिंब पडलेले असते.

अग्रलेखवजा मृत्युलेखात वृत्तपत्रकार मृत व्यक्तीबद्दल त्याला जाणवलेले जीवन काहीशा औपचारिकपणे अग्रलेखात व्यक्त करीत असतो. त्या व्यक्तीबद्दल त्याला जे अनुभव ज्ञात असतात त्यातूनच हा अग्रलेख लिहिला जात असतो. मात्र वृत्तपत्रकाराच्या वाङ्मयीन शैलीच्या ताकदीवर तो अग्रलेख जरी वृत्तपत्रीय असला तरी इतर वृत्तपत्रीय लेखनापेक्षा अग्रलेखाचे स्वरुप निराळे असते. अग्रलेख म्हणजे केवळ घटना किंवा बातमी नसते. तर तत्कालिक घटनेच्या अनुषंगाने वृत्तपत्रकाराने आपल्या वैचारिक, वाङ्मयीन, भावनिक अनुभूतीतून त्याचे लेखन केले असल्याने त्याला वेगळे स्वरुप लाभते. मृत व्यक्तीवर लिहिलेल्या अग्रलेखवजा मृत्युलेखांचे स्वरुपही असेच असते. अशा अग्रलेखांचे यशापयश पत्रकाराची व्यक्तिविषयक अनुभूती व त्याच्या अभिव्यक्तीचे सामर्थ्य यावर अवलंबून असते. त्याला त्या व्यक्तीविषयी माहित असणारे निरनिराळे पैलू अग्रलेखात जुळवून तो त्यावर भाष्य करीत असतो. अशा प्रकारच्या मृत्युलेखांचे स्वरुप बहुतांशी पत्रलेखनपर असते. मृत्युलेखाची सुरुवात 'कळविण्यास वाईट वाटते की,' 'वाचक हो,' माझे अंतःकरण शतधा विदीर्ण होते आहे,' 'आमच्याप्रमाणेच असंख्य वाचकांना अंतःकरणपूर्वक दुःख वाटल्यावाचून राहणार नाही,' अशा घरगुती भाषेने अग्रलेखवजा मृत्युलेखास मृत्युलेखकार सुरुवात करतो व वाचकांशी जवळीक साधतो. त्याला व्यक्ती विषयक माहिती असलेले सत्य अग्रलेखाच्या चौकटीत बसवावे लागते. त्यामुळे साहजिकच त्याच्यावर मर्यादा पडतात. विस्ताराच्या दृष्टीने असे मृत्युलेख फारसे लांबलचक असत नाहीत. मात्र 'साप्ताहिके', 'मासिके' यांच्यासाठी लिहिण्यात येणाऱ्या मृत्युलेखांना जास्त जागा मिळू शकत असल्याने त्यांचे स्वरुप निबंधवजा होते. अग्रलेखवजा मृत्युलेखांमधूनन मृत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे मर्यादित स्वरुपात वाचकांस दर्शन घडते.

2) **व्यक्तिचित्रपर मृत्युलेख** : 'व्यक्तिचित्र' हा मृत्युलेखांमधील अतिशय महत्त्वाचा भाग असतो. कारण मृत्युलेख हा प्रत्यक्ष जीवन जगून मृत झालेल्या सत्य व्यक्तीशी संबंधित असतो. त्यामुळे त्यात काल्पनिकतेला वाव नसतो. व्यक्तीचे चित्रण हे त्या व्यक्तीच्या जीवनातील अनुभव, घटना, प्रसंग यांच्या अनुषंगाने चित्रित होत असते. व्यक्तिचित्रामध्ये व्यक्त होणारे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू व्यक्तिचित्रपर मृत्युलेखातही व्यक्त होत असतात. अशा प्रकारच्या मृत्युलेखांमधून मृत्युलेखकार मृत व्यक्तीच्या स्वभावास व व्यक्तिमत्त्व चित्रणास प्राधान्य देऊन लेखन करीत असतो. त्यामुळे साहजिकच मृत्युलेखातून व्यक्तीच्या स्वभावाचे दर्शन घडते. तिच्या बारीक सारीक सवयींबरोबर व्यक्तिमत्त्वाचे पैलूही वाचकास समजतात. व्यक्तीविषयक सहानुभूती सत्यप्रीती

यांच्या अनुषंगाने अशा प्रकारचे मृत्युलेख लिहिले जात असल्यामुळे त्यात स्वाभाविकपणे लेखकाच्या मनातील व्यक्तिपूजा व्यक्त होत असते.

3) **कथासदृश मृत्युलेख** : मृत्युलेखात मृत व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे चित्रण घटना प्राधान्यता, प्रसंग चित्रण, संघर्ष, भोवतालच्यी परिस्थिती या अंगाने झाल्यास अशा मृत्युलेखांचे स्वरुप कथासदृश्य बनते. कारण अशा प्रकारच्या मृत्युलेखांमध्ये कथानक तयार होत असते. मात्र तो मृत्युलेख कथा लिहावी या विचाराने लिहिला जात नाही तर तो कथा या प्रकारात मोडतो. असे मृत्युलेख व्यक्तिचित्रपर कथेत मोडतात. मात्र कथेमध्ये प्रसंग चित्रणासाठी लेखकास मिळणारा कल्पकतेचा अवसर मृत्युलेखामध्ये मिळत नाही. मृत्युलेखकार त्याने अनुभवलेला जीवनानुभव मृत्युलेखात शब्दबद्ध करीत असताना अशा प्रकारच्या मृत्युलेखांमध्येही त्याची भूमिका भाष्यकाराची असते. तो मृत व्यक्तीच्या जीवनातील घटना, प्रसंग, संघर्ष, जीवनचरित्र सांगत असताना त्या व्यक्तीविषयीचे त्याचे विचारही व्यक्त करीत असतो. तो हे सारे वास्तववादी दृष्टिकोनातून करीत असतो. कथेत येणारी काल्पनिकता, कथासदृश्य मृत्युलेखांमध्ये नसते. कथा सत्याच्या कसोटीवर तपासून पाहता तिच्यात सत्याचा आभास निर्माण करुन कथाकार कथालेखन करीत असतो. मात्र कथासदृश्य मृत्युलेखास सत्याची कसोटी लावता येते. अनुभवाचा खरेपणा, निर्लेपपणे मृत्युलेखकार मृत्युलेखात व्यक्त करीत असतो. मृत्युलेखकाराने मृत्युलेख वास्तवाच्या मर्यादेत खुलवलेला असतो. व्यक्तीजीवनातील घटना, प्रसंग, संघर्ष सांगण्या—पाठीमागील मृत्युलेखकाराची भूमिका ही व्यक्तीदर्शन करण्याची असते. कथा लिहिण्याची नसते. मात्र कथेतील ह्या घटकांचा अंतर्भाव मृत्युलेखामध्ये झाल्यामुळे मृत्युलेखात कथात्मकता येते. कथा ह्या वाङ्मय प्रकारातील काही घटकांचा अंतर्भाव कथासदृश्य मृत्युलेखांमध्ये झाल्यामुळे मृत्युलेखात कथात्मकता येते. कथा ह्या वाङ्मय प्रकारातील काही घटकांचे मिश्रण कथासदृश्य मृत्युलेखांमध्ये झालेले असते.

4) **निबंधसदृश मृत्युलेख** : निबंध वाङ्मयाची काही वैशिष्ट्ये ज्या मृत्युलेखांमधून दिसून येतात अशा मृत्युलेखांचे स्वरुप निबंधसदृश असते. व्यक्तीदर्शन हा जरी मृत्युलेखाचा विषय असला तरीदेखील कधीकधी हे लेखन निबंधाच्या पद्धतीने होत असते. विस्ताराच्या दृष्टीने निबंध व निबंध सदृश्य मृत्युलेख यात साम्य असते. म्हणजे अग्रलेखांना मृत्युलेखावर जी विस्ताराची मर्यादा असते ती निबंधसदृश मृत्युलेखात थोडी सैल झालेली असते. हे लेखन थोडे लांबलचक असते. व्यक्तीविषयी तर्कशुद्ध व सूत्रबद्ध प्रतिपादन निबंधसदृश्य मृत्युलेखांमध्ये येत असते. त्याचबरोबरीने

व्यक्तीविषयी विचार मांडत असताना लेखकाच्या वैचारिक व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंबही लेखात पडलेले दिसते. लेखकाचे विचार, चिंतन, भावना, अनुभव यांच्या अनुषंगाने मृत्युलेख खुलत जातो. निबंधात एखाद्या विषयावर ज्याप्रमाणे वस्तुनिष्ठ पद्धतीने निबंधकार साधक – बाधक विचार मांडत असतो त्याचपमाणे निबंधसदृश्य मृत्युलेखांमध्येही मृत्यु लेखकार वस्तुनिष्ठ पद्धतीने व्यक्तीविषयक साधक बाधक विचार मांडतो. मात्र त्याचा भर व्यक्तीच्या बाधकतेवर जास्त प्रमाणात असत नाही. साधकतेच्या अनुषंगाने बाधक विचारही तो मांडतो. पण त्यास प्राधान्य मात्र नसते. तिच्या जीवनातील कोणत्याही घटनेचा आधार त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडविण्यासाठी तो उपयोगात आणतो. केवळ प्रसंग सांगणे हे काही त्याचे उद्दिष्ट नसते. निबंधकाराला जसे विषयाचे वावडे असते तसेच निबंधसदृश्य मृत्युलेखातही विषयांतर नसते. अर्थात अशा प्रकारचे मृत्युलेख लिहिण्यासाठी मृत्युलेखकाराचे त्या व्यक्तीविषयीचे चिंतन, मनन फार महत्वाचे असते. शिवाय त्याला त्याची योजना औचित्यपूर्ण शब्दात करुन तर्कनिष्ठ पद्धतीने प्रतिपादन करावे लागते. व्यक्तिप्रधान निबंधाच्या धाटणीने निबंधसदृश्य मृत्युलेखाचे लेखन होत असते. मात्र वैयक्तिक हळहळ, जिव्हाळा ह्या बाबी मृत्युलेखात अधिक प्रमाणात येतात. कारण मृत्युलेखकार हा संवेदनशील असतो व तातकालिक भावनातिरेकातून हे लेखन होत असल्यामुळे त्यात स्वाभाविकपणे झपाटलेपण येत असते. निबंधात जशी एखाद्या विषयावर निबंधकार सांगोपांग चर्चा करीत असतो. त्याप्रमाणे मृत्युलेखातही मृत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल तो सांगोपांग चर्चा करीत असतो.

**x मृत्युलेखांची विविध अंगोपांगे –**

1. **व्यक्तिदर्शन** : व्यक्तिदर्शन हे मृत्युलेखाचे महत्त्वाचे अंग आहे. हा वाङ्मयप्रकार व्यक्तिनिष्ठ असल्यामुळे मृत्युलेखातून मृत्युलेखकाराने कशाप्रकारे व्यक्तित्त्व दर्शन घडविले आहे यास महत्त्व असते. यासाठी मृत्युलेख ज्या व्यक्तीवर लिहावयाचा आहे त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सूक्ष्म अभ्यास जेवढा मृत्युलेखकाराचा जास्त असेल तेवढा मृत्युलेख अधिक खुलून येतो. हे लेखकाला एक प्रकारचे आव्हानच असते. कारण जरी व्यक्तिमत्वाचा सूक्ष्म अभ्यास असला तरी व्यक्तीला तिच्या व्यक्तिमत्त्वातील कोणत्या भागास अधिक उजाळा द्यायचा व कोणत्या भागाचे चित्रण गौण पद्धतीने करावयाचे हे लेखकास जमायला हवे. मृत्युलेख हा मृत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध असतो. लेखकाला व्यक्तिविषयक आलेले अनुभव हे विस्कळीत असतात. हे अनुभव त्याला सुसूत्र पद्धतीने मांडून कलात्मक रुप द्यावे लागते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचेअनेक पैलू सांगणे हे लेखकाचे उद्दिष्ट असते. त्याबरोबरीने त्या व्यक्तीच्या जीवनातील जीवनमूल्यांचे दर्शनही तो घडवत असतो. जीवनभाष्य

करीत असतो. हे सारे करीत असताना त्याला तारतम्य पाळावे लागते. व्यक्तीचे विचार, तिच्यातील आदर्श, स्वभाव यांचे दर्शन घडवीत असताना तो स्वतःची व्यक्तीविषयक चिंतनशीलतेतूनच निर्माण झालेली मते व्यक्त करीत असतो. व्यक्ती – व्यक्तींच्या अनुषंगाने तिची स्वभाववैशिष्टये, तिचे कार्य वाचकांपर्यंत पोहचविणेहा मृत्युलेखाचा उद्देश असतो. सामान्य व्यक्तीच्या जीवनातदेखील मृत्युलेखकार जीवनचिंतन करुन तिचे जीवनदर्शन घडवू शकतो, मृत्युलेखातील कलानुभव हा व्यक्तीचे जीवन हेच असल्यामुळे मृत्युलेखात मृत व्यक्तीचे व्यक्तित्त्वदर्शन घडविणे हे एक महत्त्वाचे अंग होय.

2. **भावनिकता :** भावनिकता हे मृत्युलेखाचे महत्त्वाचे अंग होय. कारण मृत्युलेख हा मृत व्यक्तीवर लिहिला जाणारा वाङ्मयप्रकार असल्यामुळे व मृत्यू हा प्रकार एकाच वेळी भावनेला स्पर्श करून व्यक्तीबद्दल समर्थ, अलिप्त, एकरूप व अचूक वर्णन यशस्वी मृत्युलेखात येत असते. म्हणजेच हा वाङ्मयप्रकार जसा व्यक्तीनिष्ठ आहे. तसा लेखकनिष्ठही आहे.निव्वळ कोरडेपणाने हे लेखन करून चालत नाही तर त्यात लेखकाच्या भावनिकतेलाहि महत्त्व असते. याचे कारण म्हणजे जेव्हा एखादया व्यक्तीचा मृत्यू लेखकाच्या मनाला भावतो तेव्हा त्याच्याकडून त्या व्यक्तीवर यशस्वी मृत्युलेख लिहिला जातो. अन्यथा केवळ एखादया व्यक्तीच्या मृत्यूची दखल घ्यायची आहे या औपचारिक भावनेतून मृत्युलेख लिहिल्यास त्यात लेखकाची भावनिकता येत नाही व लेखन कोरडे होते. मृत व्यक्तीबद्दलच्या लेखकाच्या भावना ह्या वाङ्मय प्रकारातून व्यक्त होत असल्याने मृत्युलेखात भावनिकतेस स्वाभाविक महत्त्व आहे. शिवाय मृत्युलेख ज्या व्यक्तीवर लिहावयाचा त्या व्यक्तीचा मृत्यू ही साहाजिकच लेखक व वाचक दोघांच्याही दृष्टीने दुःखदबाब होय. परंतु लेखकास केवळ शोकसागरात बुडून जाऊनही चालत नाही. तो जरी हे लेखन शोक भावनेतून करीत असला तरी देखील त्याला मनाचे तारतम्य पाळावे लागते. काहीशा तटस्थपणे, अलिप्तपणे व धीरोदात्तपणे त्याला हे लेखन करावे लागते. मात्र ही तटस्थता, अलिप्तता निव्वळ कोरडी नसते तर त्यातही भावनिक ओलावा असतो. त्यामुळे तो पूर्णपणे तटस्थ राहून लेखन करू शकत नाही. तो तटस्थ राहतो. म्हणजे आकारण मृत्युलेखात लुडबुडत नाही. मात्र जिथे लेखकाला त्या व्यक्तीबद्दलची आपली भावना व्यक्त करायची असते तिथे तो आपले मतनोंदवत जातो. त्यामुळे भावनिकता हे मृत्युलेखामधील एक महत्त्वाचे अंग आहे हे स्पष्ट होते.

3. **व्यक्तिगत व सांस्कृतिक पार्श्वभूमी –** मृत्युलेखामधून लेखकाची व्यक्तिगत व सांस्कृतिक पार्श्वभूमी व्यक्त होत असते. त्यामुळे हे अंगही मृत्युलेखात महत्त्वाचे ठरते. मृत्युलेखकाराची मृत व्यक्तीच्या जीवनाविषयीची अनुभूती ही व्यक्तिगत स्वरूपाची असते. त्याला त्या व्यक्तीच्या

व्यक्तिमत्त्वातील ज्या भागाचे अधिक आकलन झाले असेल त्या अनुषंगाने तो मृत्युलेखात अनुभूतीस स्थान देत असतो. त्यामुळे मृत्युलेखकाराला व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन हे जास्त महत्त्वाचे असते. ही व्यक्तिगत अनुभूती मृत्युलेखातून व्यक्त होत असते. तसेच व्यक्ती ज्या सांस्कृतिक पार्श्वभूमीशी संबंधित असते ती सांस्कृतिक पार्श्वभूमी त्या व्यक्तीच्या कार्याच्या अनुषंगाने त्या लेखनात येत असते. सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय घडामोडींची दखल मृत्युलेखकार घेत असतो. त्यामुळे मृत्युलेखातील व्यक्तिगत पार्श्वभूमी व सांस्कृतिक पार्श्वभूमी हे एक महत्त्वाचे अंग होय.

4. **वर्ण्य व्यक्ती व लेखक यातील संबंध** – मृत्युलेख ज्या व्यक्तीवर आहे ती व्यक्ती जिवंत असताना ती व्यक्ती व मृत्युलेखकार यांच्यातील संबंध जेवढे जवळचे असतील तेवढे त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन लेखकास जास्त होते. कारण कोणतीही व्यक्ती सहवासातूनच अधिक समजत असते. त्यातून मृत्युलेखात वर्ण्य व्यक्तीसंबंधीच्या वैयक्तिक जीवनातील आठवणींना प्राधान्य देवून मृत्युलेखाचे लेखन करता येते. आठवणीं मधून देखील व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व उभे करता येते. व्यक्तीच्या संपर्कामुळे तिचा स्वभाव, तिचे विचार यांचा लेखकास परिचय होत असतो. त्यामुळे लेखकाची त्या व्यक्तीविषयीची भावनिकताही व्यक्त होत असते. मृत व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व मृत्युलेखकारास किती समजले यावरच मृत्युलेखाचे यश अवलंबून असल्यामुळे जर व्यक्तीशी व्यक्तिगत परिचय असेल तर व्यक्ति विशेषांचे वेगळेपण येते. जसे व्यक्तीचे व्यक्तिचित्र लिहित असताना लेखकास त्या विशिष्ट व्यक्तीबद्दल काही विशेष माहिती असणे आवश्यक असते. तीच बाब मृत्युलेखाच्या लेखनातही आवश्यकअसते. यामधून त्या लेखनातून व्यक्ती प्रकट होत असते. यासाठीच त्या व्यक्तीशी लेखकाच्या असणा–या संबंधानुसार मृत्युलेखाचे लेखन होत असते. अर्थात कोणीही व्यक्ती सर्वगुणसंपन्न नसते. त्यामुळे फक्त गुणांचे गुणगान करणे एवढेच लेखकाचे उद्दिष्ट नसते तर त्या अनुषंगाने त्याने त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील अनुभवलेले दोषही तो सांगून जातो. मात्र गुणगानावर अधिक भर देऊन दोषांकडे दुर्लक्ष करतो. हे सारे करीत असताना त्याला खरेपणाचा मूळ धागा तोडून चालत नाही. लेखकाच्या खरेखोटेपणाचा प्रत्यय या वाङ्मय प्रकारात येत असतो. त्यामुळे व्यक्तीचे यथोचित आकलन होण्याच्या दृष्टीने वर्ण्य व्यक्ती व मृत्युलेखकार यांच्यामधील संबंधास फार महत्त्व आहे.

5. **कलात्मक अलिप्तता** – मृत्युलेखांचे लेखन समाजातील अनेक स्तरांमधील व्यक्तींवर होत असते. अर्थात हे लेखन मृत व्यक्तीबद्दल असणा–या नितांत आदराच्या भूमिकेतून लेखक करीत

असतो. त्या व्यक्तीच्या कार्याचा समाजावरील व स्वतःवरील ठसा तिचा स्वभाव, वैचारिकता यांचे चित्रण करीत असताना त्याला कलात्मक अलिप्तता सांभाळावी लागते. मृत्युलेख लेखकाचा मृत व्यक्तिबद्दलचा दृष्टिकोन स्वाभाविकपणे काहीसा उदार असतो. मात्र ह्या औदार्यातही त्याला तारतम्य पाळावेच लागते. तो गुणांचे कौतुक सढळ हाताने करतो त्या अनुषंगाने जरी दोषांबद्दल भाष्य आले तरी त्याचा भर दोष दाखवण्यावर नसतो तर गुणांच्या अनुषंगाने तो दोषांचा उल्लेख करीत असतो.

मृत्युलेखात लेखकाने एकसारखे डोकावणे मृत्युलेखाच्या यशाच्या दृष्टीने हानीकारक असते. मात्र त्याने अजिबातच डोकावू नये हेदेखील योग्य नव्हे. कारण हा वाङ्मय प्रकार लेखकाच्या भावनेला आव्हान करणारा असल्याने मृत्युलेखात लेखकाच्या भावनिकतेला स्थान असतेच. मात्र त्याला केवळ भावविवशता व्यक्त करुन चालत नाही तर त्याला तो लेख लालित्यपूर्ण पद्धतीने वठवावयाचा असतो. त्यादृष्टीने तारतम्य दाखवून व्यक्तींच्या जीवनातील प्रसंग जिव्हाळयाने सांगणे हे लेखकाचे कौशल्य होय. मात्र हे करीत असताना लेखक व्यक्तीप्रेमाच्या महापूरात वाहून जाण्याची शक्यता असते. त्यामुळे मृत्युलेखात मृत्युलेखकाराने समतोल साधला आहे की तो वाहत गेला आहे यावर मृत्युलेखाचे बरेचसे यश अवलंबून असते. अलिप्तता राखणे म्हणजे लेखनापासून लेखकाने आपले वैचारिक, वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व पूर्णपणे बाजूला ठेवले असे नव्हे. निव्वळ कोरडेपणा म्हणजे अलिप्तपणा असे ह्या वाङ्मय प्रकाराबाबत तरी म्हणता येणार नाही. मृत्युलेख लिहित असताना कलात्मक अलिप्तता ठेवून देखील लेखकास मृत व्यक्तीबद्दलचा जिव्हाळा व्यक्त करता येतो. अशी कलात्मक अलिप्तता राखणे हे एक मृत्युलेखाचे महत्त्वाचे अंग ठरते.

**✱ मृत्युलेख – एक वाङ्मय प्रकार :**

✱ मृत्युलेख आणि इतर वाङ्मय प्रकार यांचा संबंध पडताळून पाहिला असता त्या वाङ्मय प्रकारांहून मृत्युलेख ह्या वाङ्मय प्रकाराचे वेगळेपण कशात आहे हे ध्यानात येते. हा जरी संमिश्र वाङ्मय प्रकार असला व चरित्र, व्यक्तिचित्र, कथा, निबंध ह्या वाङ्मय प्रकारांमधील काही घटक मृत्युलेखात मिसळले असले तरीदेखील अभिव्यक्तीच्या दृष्टीने मृत्युलेख हा वेगळा वाङ्मय प्रकार ठरतो. कलाकृतीतील आशय जरी एकच असला तरी वेगवेगळया कलाकृतींमधून त्याची अभिव्यक्ती मात्र निराळया पद्धतीने होत असते. उदा. कादंबरी ज्या विषयावर लिहिली आहे तोच विषय जर नाटकात मांडायचा झाला तर अभिव्यक्तिची पद्धती बदलते. म्हणजे कादंबरी ह्या वाङ्मय प्रकारापेक्षा नाटक हा वाङ्मयप्रकार वेगळा होतो. हीच गोष्ट मृत्युलेख सदृश्य इतर वाङ्मय प्रकार आणि मृत्युलेख यात दिसून येते.

* निराळया प्रकारे व्यक्तीदर्शन घडवणारा वाङ्‌मयप्रकार- बहुतांशी वाङ्‌मय प्रकारांमध्ये मानवी जीवनाचेचे म्हणजेच व्यक्तींचे चित्रण येत असले तरीही मृत्युलेखात मात्र व्यक्तीदर्शन निराळया त-हेने होत असते. आशय सादर करण्याची निराळी पद्धती म्हणजेच निराळा वाङ्‌मय प्रकार हे व्यक्ती सादर करण्याचे निराळेपण मृत्युलेखात आढळते. व्यक्तीच्या जीवनातील घटना, प्रसंग, समकालीन सांस्कृतिक पार्श्वभूमी, व्यक्तिगत आठवणी, जिव्हाळा, हेवेदावे या अनुषंगाने मृत व्यक्तीच्या जीवनाचे मूल्यमापन या वाङ्‌मय प्रकारात केलेले असते. त्यामुळे हा वाङ्‌मय प्रकार निराळया प्रकारे व्यक्तीदर्शन घडविणारा आहे.

* लेखकाच्या (मृत्युलेखकाराच्या) व्यक्तिमत्वाचे प्रत्यंतर-- वाङ्‌मयीन कलाकृतीत लेखकाने डोकावणे हे जरी योग्य नसले तरीदेखील मृत्युलेखात मात्र मृत्युलेखकाराचे वाङ्‌मयीन वैचारिक, सामाजिक, राजकीय विचार या ना त्या कारणाने व्यक्त झाल्याने लेखकाचे व्यक्तिमत्व ह्या वाङ्‌मय प्रकारात मिसळलेले असते. अर्थात हे सारे मृत व्यक्ती साकार करण्याच्या अनुषंगानेच होत असल्याले त्यात काही गैर नाही.

* मृत व्यक्तीच्या व्यक्तित्वाचे अनेकांगी दर्शन व लेखकाचे व्यक्तीजीवनावरील भाष्य - 'व्यक्ती समजून घेणे आणि ती सादर करणे' हे करीत असताना व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक अंगे समजून घेणे क्रमप्राप्त असते. त्यात इतर वाङ्‌मय प्रकारांमध्ये व्यक्तीदर्शन घडविताना त्यात कल्पनेचे रंग भरता येतात. परंतु मृत्युलेखातील व्यक्तीही वास्तव जीवनातील व्यक्ती असल्याने लेखकास तिच्या व्यक्तिमत्त्वाची विविध अंगे आधी समजावून घेऊन मगच तिचे सादरीकरण करावे लागते. मृत्युलेखकार हा ज्या मृत व्यक्तीवर मृत्युलेख लिहित असतो तिचे अंतरंगासह दर्शन घडवण्याचा त्याचा प्रयत्न असतो. तसेच तो व्यक्तीच्या जीवनाचा जीवनव्यापी आढावा घेऊन तिच्या जीवनातील जीवनमूल्ये, जाणिवा, जीवनविषयक तत्त्वज्ञान इत्यादी बाबींवर भाष्य करीत असतो. त्यामुळे साहजिकच मृत्युलेखात जीवनभाष्य येते.

* अनुभवाच्या खरेपणाचे प्रत्यंतर - हा वाङ्‌मय प्रकार लेखकाच्या अनुभवाच्या खरेपणाचे प्रत्यंतर घडवणारा आहे. लेखक उगाचच व्यक्तीचे उदो उदो करतो आहे किंवा उगाचच वाभाडे काढतो आहे हे वाचक (रसिक) चटकन ओळखू शकतो. हा वाङ्‌मय प्रकाराच मुळात वास्तव जीवनाशी संबंधित असल्यामुळे आणि मृत व्यक्ती या ना त्या कारणाने वाचकांस माहित असल्या कारणामुळे अनेक मर्यादा घालून घेऊन हे लेखन करावे लागते. कदाचित एखादी सामान्य व्यक्ती जरी मृत्युलेखाचा विषय झाली असली तरी लेखकास त्या सामान्य व्यक्तीमधील असामान्यत्व नेमके कसे होते हे (ज्या रसिक वाचकास ती व्यक्ती माहित नाही) त्याच्या मनाला भावेल अशा पद्धतीने चित्रित

करावे लागते. त्यामुळे अनुभवाच्या खरेपणाचे प्रत्यंतर आणून देणारा हा वाङ्‌मयप्रकार आहे.

एकंदरीत व्यक्तिदर्शन, जीवनविषयक जाणिवांचे चित्रण, जीवनविषयक चिंतन, संवेदनशीलता, अनुभूतीची अभिव्यक्ती, समाजाभिमुखता, जीवनसंदर्भ, आत्माविष्कार, वस्तुनिष्ठता, जीवनविषयक प्रगल्भता, कलात्मकता, सौंदर्यपूर्णता, रसनिर्मिती (विशेषतः करुण रस) भाषिक वापर ही वाङ्‌मयीन वैशिष्टये मृत्युलेख ह्या वाङ्‌मय प्रकारातही आढळतात. त्यामुळे मृत्युलेख हा एक वेगळा वाङ्‌मयप्रकार आहे.

वरील विवेचनाआधारे आपणास खालील निष्कर्ष काढता येतील.

1. 'मृत्युलेख' हा इंग्रजी वाङ्‌मयातून मराठी वाङ्‌मयात येऊन स्थिर झालेला वाङ्‌मयप्रकार होय.

2. 'मृत्युलेख' हा भावनिक वाङ्‌मयप्रकार असून व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिला वाङ्‌मयीन श्रद्धांजली वाहण्यासाठी त्याचे लेखन होते.

3. इतर वाङ्‌मय प्रकारांच्या सीमारेषा मृत्युलेखात मिसळल्या असल्या तरीदेखील अभिव्यक्तीच्या दृष्टीने हा वेगळा प्रकार ठरतो.

4. व्यक्तीचे विविधअंगी दर्शन घडवणारा वाङ्‌मय प्रकार म्हणून मृत्युलेखास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले असते.

5. सत्यकथन हे मृत्युलेखाचे महत्त्वाचे सामर्थ्य होय. व्यक्तीदर्शन घडवत असताना मृत्युलेखकार तिच्या जीवनातील जीवनमूल्यांना महत्त्व देवून तो जीवनभाष्य व जीवनचिंतन करीत असतो.

6. मृत्युलेखात मिसळलेले लेखकाचे व्यक्तिमत्त्व मृत्युलेखास बाधक ठरत नाही उलट ते साधकच ठरते. (मात्र त्याने व्यर्थ लुडबुड करता कामा नये.)

7. अनुभवाचा खरेपणा, वास्तवादी दृष्टिकोन, व्यक्तीदर्शनातील तारतम्य, लेखकाची सद्सद्विवेकबुद्धी, वास्तवाभिमुखता ही मृत्युलेखाची महत्त्वाची वैशिष्ट्ये होत.

8. मृत्युलेखातून व्यक्तीजीवनाच्या अन्वयार्थामागे मृत्युलेखकाराची विचारसरणी स्पष्टपणे जाणवते.

9. मृत्युलेखकारास आकलन झालेले व्यक्तीचे जीवन, जीवनातील गुंतागुंत, घटना, प्रसंग, गवसलेला जीवनार्थ सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ यावर मृत्युलेख लेखनाचे यश अवलंबून असते. ह्या लेखनास वाङ्‌मयीन महत्त्वाबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वही प्राप्त होत असते.

10. व्यक्तीच्या जीवनाचा हा एकंदरीत जीवनव्यापी आढावा असल्यामुळे व्यक्तीला मूळापासून समजून देणारा वाङ्मय प्रकार म्हणून ह्या वाङ्मयप्रकारातून व्यक्त झालेले व्यक्तिदर्शन महत्त्वपूर्ण ठरते.

*****

## – तळटीपा –

1. अनंत वामन वर्टी : 'पिसारा' प्रथमावृत्ती : जोशी ब्रदर्स, पुणे : 1949 : पृष्ठ 48.
2. तत्रैव : पृष्ठ 50
3. तत्रैव : पृष्ठ 49
4. संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी : 'मराठी विश्वकोश खंड 12 : प्रथमावृत्ती : महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई : 1985 : पृष्ठ 1262.
5. तत्रैव : पृष्ठ 1279
6. प्र. न. जोशी : 'मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास' प्रथमावृत्ती : प्रसाद प्रकाशन पुणे : 1979 : पृष्ठ 74.
7. Edit. World Book inc : ' World Book Encyclopedia' 3rd Edition : A Scoot Fetzer Company. London : 1994 : Page - 307
8. तत्रैव : पृष्ठ 193
9. प्र. के. अत्रे : 'हुंदके' द्वितीयावृत्ती : परचुरे मुंबई : 1989 : प्रस्तावना (स.ग.मालेशे)
10. भीमराव कुलकर्णी 'काही साहित्यिक काही साहित्यकृती : प्रथमावृत्ती : उत्कर्ष प्रकाशन, पुणे : 1987 : पृष्ठ 16
11. तत्रैव : पृष्ठ 18
12. प्र. के. अत्रे : क–हेचे पाणी खंड 1 : 'प्रथामावृत्ती' परचुरे मुंबई : 1963 : पृष्ठ 230
13. ग. का. रायते : 'मराठी चरित्र' : मूलतत्त्वे व समीक्षा' प्रथमावृत्ती : समर्थ प्रकाशन : समर्थ प्रकाशन, मुंबई : 1985 : पृष्ठ 8.
14. तत्रैव : पृष्ठ 36
15. तत्रैव : पृष्ठ 25
16. दा. वि. कुलकर्णी : मराठी कथा – स्वरुप आणि आस्वाद' प्रथामवृत्ती : स्वाध्याय प्रकाशन, पुणे 1976 : पृष्ठ 126.
17. तत्रैव : पृष्ठ 114
18. तत्रैव : पृष्ठ 82